वर्ष ९ वें अंक २ रा

२४ नोव्हेंबर १९५७

# संजीवन

जीवनाच्या सर्वांगीण विकसनार्थ त्रैमासिक



संजीवन कार्यालय, श्रीअरविंद आश्रम, पाँडिचेरी – २

वर्ष ९. अंक २ २४ नोव्हेंबर, १९५७

# संजीवन

## जीवनाच्या सर्वांगीण विकसनार्थ त्रैमासिक



संपादक :

भालचंद्र लिमये

**संजीवन कार्यालय**

श्रीअरविन्द आश्रम, पाँडीचेरी

वार्षिक वर्गणी यथाशक्ति

संपादक--भालचंद्र लिमये.
प्रकाशक—'संजीवन कार्यालय' श्रीअरविन्द आश्रम. पांडीचेरी.
मुद्रक—श्रीअरविन्द आश्रम प्रेस, पांडिचेरी
892/57/10/1000



# २४ नोव्हेंबर १९५७

अतिमानव कोण? भौतिकतासक्त विच्छिन्न मनोमय मानव व्यक्तीहून जो उच्च जाऊं शकतो आणि दिव्य शक्ति, दिव्य प्रेम व आनंद आणि दिव्य ज्ञान या रूपांत विश्वव्यापकत्व धारण करून देवत्व पावूं शकतो तो अतिमानव.

हा मर्यादित मानवी अहंकार कायम राखूनहि जर तूं स्वतःस अतिमानव समजत असशील तर तुझ्या गर्वानें तूं केवळ मूढ झाला आहेस, तुझ्या स्वतःच्या शक्तीच्या हातचें खेळणें आणि तुझ्या स्वतःच्या भ्रमांच्या हातचें साधन तूं झाला आहेस.

—श्रीअरविंद

SABCL Vol 17 : Page 95

# अनुक्रमणिका


| विषय | | | | पृष्ठ |
|---|---|---|---|---|
| १ प्रार्थना आणि ध्यान | ... | श्रीमाताजी | ... | ५ |
| २ मृत्यूचें भय आणि तें | ... | " | ... | ७ |
| जिंकण्याच्या चार पद्धती | ... | " | ... | |
| ३ श्रीमाताजींचीं प्रवचनें– | ... | " | .. | १२ |
| ४ निसर्गाचीं तीन पावलें | ... | श्रीअरविंद | ... | १९ |
| ५ धीर व चिकाटी | ... | श्रीमाताजी | ... | २३ |
| ६ फुलांचे आध्यात्मिक अर्थ | ... | श्रीमाताजी | ... | २७ |
| ७ स्फुट विचार | ... | श्रीअरविंद | ... | २८ |
| ८ भारताचें भवितव्य | ... | " | ... | २९ |
| ९ कांहीं स्पष्टीकरणें | ... | " | ... | ३१ |
| १० वाचकांचे प्रश्न | ... | रेवान् | ... | ३५ |
| ११ दिव्य-जीवन | ... | श्रीअरविंद | ... | ३८ |
| १२ युवकांनो,— | ... | " | ... | ४१ |
| १३ आश्रम-वृत्त | ... | | ... | ४२ |
| १४ साहित्य-सत्कार | ... | | ... | ४४ |

वर्ष ९ अंक २ २४ नोव्हेंबर १९५७

# संजीवन

तमसापलीकडील उच्चतर ज्योति पहात,
देवतांमधील दिव्य सूर्याप्रत, सर्वोच्च ज्योतिप्रत आम्ही आलो.

ऋग्वेद–१. ५०. १०

---

## प्रार्थना आणि ध्यान

१ फेब्रुवारी १९१४

हे प्रभो, मी तुझ्याकडे वळत आहे. तू सर्वत्र विद्यमान् आहेस, सर्वांतर्यामीं आहेस, सर्वांच्या बाहेर आहेस, सर्वांचें प्राणभूत असें मूलतत्त्व आहेस, पण सर्वांहून अलगहि आहेस, समस्त शक्तींचें घनीभूत केंद्रस्थान आहेस, सचेतन व्यक्तींचा निर्माता आहेस. हे जगदोद्धारका, मी तुझ्या सन्मुख येऊन तुला वंदन करीत आहे आणि तुझ्या दिव्य प्रेमाशीं एकरूप होऊन पृथ्वी आणि पृथ्वीवरील प्राणी यांविषयीं मी विचार करीत आहे. नित्य नष्ट होऊन वारं-वार नवनवीन विविध रूपें धारण करणाऱ्या मृण्मय, पार्थिव द्रव्याविषयीं आणि रचना झाल्या-बरोबर विघटन होणाऱ्या प्रचंड वस्तुसंघाताविषयीं मी विचार करीत आहे. अशा प्राण्यां-विषयींहि मी विचार करीत आहे, जे स्वतःला सचेतन आणि स्थायी व्यक्तित्वयुक्त समजतात पण जे वास्तविक एकाद्या श्वासोच्छ्वासाइतके क्षणभंगुर असतात. विविध असूनहि नेहमींच एकसारखे व परस्पर समान असतात, त्याच त्या वासना, प्रवृत्ती, रुचि, त्याच अज्ञानपूर्ण चुका अनंतकाळपर्यंत पुनःपुनः ते करीत रहातात.

परंतु मधून मधून तुझा उदात्त प्रकाश एकाद्या व्यक्तीमध्यें झळकतो आणि त्या व्यक्ती-द्वारां अखिल जगतामध्यें त्याची प्रभा फांकते आणि नंतर थोडीशी बुद्धिमत्ता, थोडेसें ज्ञान, अनासक्त श्रद्धा, वीरता आणि करुणा मानवी हृदयामध्यें प्रवेश करूं लागतात, त्यांचीं मनें

रूपांतरित करून टाकतात आणि त्यांच्या अंध अज्ञानामुळें ज्या दुःखमय व कठोर संसार चक्रामध्यें ते सांपडले आहेत त्यांतील कांहीं भाग मुक्त करतात.

परंतु शहरी जीवन व तथाकथित सुधारणांमुळें मनुष्यप्राणी ज्या भयंकर भ्रमामध्यें बुडून गेला आहे, मार्गभ्रष्ट झाला आहे त्यांतून त्याला बाहेर काढण्यासाठीं पहिल्यापेक्षां कितीतरी वैभवाची, कितीतरी आश्चर्यकारक वीरश्रीची व ज्ञानाची, प्रकाशाची आवश्यकता आहे! स्वार्थी, हीन आणि मूर्खतापूर्ण समाधानांसाठीं जो कटु संघर्ष मनुष्याच्या वासना करीत राहिल्या आहेत त्यापासून मनुष्याला परावृत्त करून, ज्या चक्रव्यूहाच्या कापटचपूर्ण चकाकीमागें मृत्यू लपून राहिला आहे त्यांतून त्याला वर खेंचून, त्याला तुझ्या विजयदायी सुसंवादाकडे वळविण्यासाठीं किती उग्र पण त्याचबरोबर दिव्य मधुर शक्तीची आवश्यकता आहे!

हे प्रभो, सनातन गुरो, आम्हांला प्रकाश दे, पथप्रदर्शन कर, तुझ्या इच्छापूर्तीचा, तुझें कार्य पूर्ण करण्याचा मार्ग आम्हांला दाखव.

मौन भावामध्यें मी तुझें पूजन करीत आहे आणि पावन एकाग्रतेमध्यें तुझा शब्द ऐकत आहे.

CWMCE - Volume 01 : Page 63

★

२ फेब्रुवारी १९१४

हे प्रभो, सर्व एकाकीपणा ज्यानें भरला जाईल व प्रत्येक दुःख ज्यानें नष्ट होईल असें एक जिवंत प्रेम मी व्हावें!

हे प्रभो, मी आक्रोश करीत आहे, सर्व दुःखें भस्मीभूत करणारी आणि सर्वांच्या हृदयांत आपल्या किरणांचा वर्षाव करून सर्व दुःखांचें आनंदमय प्रकाशांत रूपांतर करणारी धगधगती ज्वाला मला बनव.

माझी प्रार्थना स्वीकृत कर, पावन प्रेम आणि असीम करुणा यांमध्यें मला रूपांतरित कर.

★

CWMCE - Volume 01 : Page 65

५ फेब्रुवारी १९१४

ह्या एकचएक अभीप्सेव्यक्तिरिक्त दुसरें मी काय म्हणूं? दिव्य प्रेमाचें नियमन, तुझ्या विषयींच्या उच्चतम विचारांची शुद्धतम अभिव्यक्ति पृथ्वीवर अधिकाधिक कार्यकारी होऊन सर्व अज्ञानी अहंकारावर विजयी होऊं दे. त्याच प्रेमाच्या आणि प्रकाशाच्या शक्तीचें अधिकाधिक पूर्णतेनें निष्ठावंत सेवक बनून, त्यामध्येंच आम्ही निवास करावा, त्यामुळेंच आम्ही जगावें, निरंतर केवळ त्याचाच आमच्यामध्यें निवास होऊन त्याचेंच कार्य आमच्याद्वारां व्हावें. हे अधिनायका, आमच्या जीवनाचा तूच सर्वोच्च स्वामी हो, तुझ्या दर्शनामध्यें व तुझ्याशीं निरंतर युक्त होण्यामध्यें जो अंधकार अजूनहि बाधा उत्पन्न करीत आहे त्याचा विनाश कर.

सर्व अज्ञानापासून आम्हांस मुक्त कर. आमच्या स्वतःपासूनच आमची सुटका कर म्हणजे तुझ्या गौरवपूर्ण आविष्काराचीं द्वारें आम्हीं पूर्णपणें उघडूं शकूं.

—श्रीमाताजी

CWMCE - Volume 01 : Page 66

# मृत्यूचें भय
# आणि
# तें जिंकण्याच्या चार पद्धती

मानवाच्या प्रगतीस अडथळा आणणारी, कदाचित् सर्वांत मोठी गोष्ट कोणती असेल तर ती भीति होय असें सामान्यतः म्हणतां येईल. ही भीति अगणित व विविध प्रकारची, विरोधयुक्त, तर्कविसंगत, अकारण आणि पुष्कळवेळां निर्बुद्धतादर्शक असते. सर्व प्रकारच्या भीतीपैकीं अतिसूक्ष्म आणि आपणांस नेहमीं चिकटलेली, दृढमूल भीति म्हणजे मृत्यूची भीति होय. या भीतीचीं मुळें आपल्या सुप्त मनामध्यें खोलवर जाऊन पोंचलेलीं असल्यामुळें तिचें तेथून निर्मूलन करणें सोपें नाहीं. उघडच आहे कीं, या भीतीमध्यें वेगवेगळ्या अनेक गोष्टींची गुंतागुत असतेः—जीवधारणेची, जीवन संरक्षणाची भावना, आत्मभानाचें सातत्य टिकून रहावें म्हणून आत्मरक्षणाची चिंता, अज्ञातापासून दूर सरण्याची प्रवृत्ति, अनपेक्षित आणि अकल्पनीय असें कांहींतरी आहे या भावनेमुळें उत्पन्न होणारी मनाची अस्वस्थता आणि कदाचित् या सर्वांच्या मागें असलेली, देहाच्या प्रत्येक पेशींच्या पोटीं दडलेली अशी सहजप्रवृत्तिरूप श्रद्धा कीं मृत्यू, हा कांहीं अटळ नाहीं, परिस्थितीची अनुकूलता मिळाल्यास मृत्यूहि जिंकतां येईल. अर्थात् मृत्यू जिंकण्याच्या मार्गांत मृत्यूविषयींची ही भीतीच मुख्यतः आड येणारी मोठी गोष्ट असते. कारण एकाद्या गोष्टीबद्दलची भीति गेली तरच तीवर आपण विजय मिळवूं शकतो, म्हणून जो कोणी मृत्यूला भितो त्याला मृत्यूनें आधींच पराजित केलेलें असतें.

ही भीति नाहींशीं कशी करावयाची ? अनेक रीतींनी ही भीति जिंकतां येईल. परंतु सुरुवातीलाच या कार्यास उपयोगी पडणाऱ्या कांहीं मूलभूत कल्पनांची मदत घेतली पाहिजे. पाहिली आणि सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे जीवन हें आविभाज्य आणि सनातन, अमर आहे हें जाणून घेणें. त्याचीं अगणित रूपें हीं तेवढीं क्षणजीवि व नश्वर असतात, ही धारणा आपण मनामध्यें दृढ व कायम केली पाहिजे आणि कोणत्याहि आकारावर अवलंबून नसूनहि सर्व आकारांतून आविष्कृत होणाऱ्या शाश्वत प्राणतत्त्वाशीं, शाश्वत जीवनाशीं आपली जाणीव शक्य तितकी एकरूप केली पाहिजे. त्यामुळें अत्यावश्यक असा मानसिक पाया तयार होईल. आणि तेथून मृत्यूच्या या प्रश्नाला चांगलें तोंड देतां येईल. कारण मन हेंच तर या भीतीचें स्थान आहे. सर्व प्रकारच्या भीतीपासून मुक्त रहाण्याच्या दृष्टीनें आंतरिक भूमिका जरी पुरेशी जागृत, ज्ञानपूर्ण झाली तरीहि शरीराच्या पेशींमध्यें ही भीति दडून बसते. तिचें स्वरूप अस्पष्ट असून ती एकाएकी उद्भवते; बुद्धीनें तिचें आकलन होत नाहीं. कधींकधीं तर ती अगदीं अचेतन स्वरूपांत सांपडते. आपल्या अस्तित्वाच्या खोलच्या अंधाऱ्या भागांत जाऊन या भीतीस शोधून काढावें लागतें, तिला पकडून, तीवर आपल्या प्रबुद्ध जाणीवेचा व श्रद्धेचा प्रकाश पाडावा लागतो.

प्राण जात नाहीं, तर आकार विरून जातात, आणि या विरून जाण्याची, या विघटनाची आपल्या भौतिक चेतनेला भीति वाटत असते. तरीहि आकारांतील हा बदल सारखा होतच असतो आणि या बदलामुळें घडणारी प्रगति कोणीहि थांबवूं शकत नाहीं. उलट असा हा उत्तरोत्तर प्रगतिशील बदल होत असल्यामुळेंच मृत्यूची अटळता नाहींशीं होण्याची शक्यता तरी निर्माण झाली आहे. तरीपण ही गोष्ट साधणें महाकठीण काम असून त्याकरतां आवश्यक ती मनोवृत्ति व परिस्थिति फारच थोडयांना प्राप्त करून घेतां येते. व्यक्तीच्या जाणीवेची पातळी व व्यक्तिगत स्वभावविशेष यांना अनुसरून मृत्यूची भीति जिंकण्याचे मार्ग वेगवेगळे असणार हें उघड आहे. त्यांचें चार मुख्य विभागांमध्यें वर्गीकरण करतां येईल. प्रत्येक विभागांतहि पुनः विविध प्रकार असतील पण खरें म्हणजे प्रत्येक व्यक्तीनें या बाबतींतील आपली पद्धति स्वतःच बसविली पाहिजे.

पहिल्या पद्धतींत बुद्धीस आवाहन असतें. आपण म्हणूं शकतो कीं, जगाच्या आजच्या परिस्थितींत मृत्यू ही एक अटळ गोष्ट आहे. ज्या देहानें एकदां जन्म घेतला आहे तो सहाजिकच आज ना उद्यां केव्हां तरी मरणार; आणि बहुतेक लोकांचे बाबतींत, मृत्यू हा ज्यावेळीं यावयाचा त्यावेळीं येतोच. मृत्यूची घटिका आपणांस अगोदर आणतां येत नाहीं अथवा लांबणीवर टाकतां येत नाहीं. जे मृत्यूची मार्गप्रतीक्षा करीत असतात त्यांना दीर्घ काळ तिष्ठत बसावें लागते आणि ज्याला त्याची भीति वाटत असते त्यानें कितीहि सावधानता बाळगली तरी त्याला तडाखा देऊन मृत्यू अचानक उचलून घेऊन जातो. सर्वसामान्य मानवाच्या आवाक्यांत नसलेल्या कांहीं शक्ती ज्या कांहीं थोडया लोकांनीं मिळविलेल्या असतात त्यांची गोष्ट सोडली तर, इतरांच्या बाबतींत मृत्यूची घटिका अगदीं क्रूरतापूर्वक ठरवून टाकल्यासारखी दिसते. जी गोष्ट टाळतां येत नाहीं तिला भिणें वेडेपणाचें आहे असें बुद्धि शिकविते. या दृष्टीनें प्रथम मृत्यूचा अटळपणा ध्यानीं घेऊन, पुढें काय घडणार आहे याची विनाकरण काळजी न करतां दररोज, दरक्षणीं जें करणें उत्तमांत उत्तम दिसत असेल तें शांतपणानें करीत रहावें हाच एक मार्ग आहे असें बुद्धि सांगते. बुद्धीच्या निर्णयास अनुसरून वागण्याची ज्यांनीं संवय लावून घेतलेली आहे अशा बुद्धिप्रधान व्यक्तींच्या बाबतींत ही पद्धत अत्यंत परिणामकारक ठरते. परंतु भावनाप्रधान लोकांच्या बाबतींत ही तितकीशी परिणामकारक होत नाहीं. कारण संवेदनांवर, भावनांवर ते जगत असतात व त्यांचेच त्यांच्या जीवनावर प्रभुत्व असते. त्यांनीं दुसरी म्हणजे आत्मनिरीक्षणाची पद्धत स्वीकारली पाहिजे. सर्व भावनांच्या पलीकडे, आपल्या अस्तित्वाच्या खोल शांत, निश्चल-नीरव भागामध्यें एक ज्योति सतत तेवत असते, आंतरात्म्याची ती जाणीव-ज्योति असते. तिच्या प्रकाशाच्या शोधांत रहा, त्यावर एकाग्र व्हा, तुमच्या आंतच तो प्रकाश आहे. चिकाटीनें व दृढ निश्चयानें प्रयत्न केलात तर तुम्हांला त्याचा शोध निश्चित लागेल. त्या प्रकाशांत तुम्ही प्रवेश करतां क्षणींच स्वतःच्या अमरत्वाविषयीं तुम्ही जागृत व्हाल. आपण सततच जगत आलों आहोंत व पुढेंहि जगणार आहोंत अशी तुमची भावना होईल. स्वदेहापासून तुम्ही अलग, स्वतंत्र व्हाल. तुमचें अस्तित्व-भान देहावर मुळीं अवलंबूनच नाहीं. तुम्ही स्वतः ज्या अनेक क्षणभंगुर आकारांतून प्रकट होत आला आहां त्यापैकीं केवळ एक आकार म्हणजे तुमचा आजचा देह आहे. या दृष्टीनें पाहिल्यावर मृत्यू म्हणजे 'विनाश' नसून ती फक्त एक संक्रमणावस्था आहे. या

विचारानें मृत्यूभय सर्वस्वीं नाहींसें होतें व स्वतंत्र मानवाच्या शांत, दृढनिश्चयी वृत्तीनें तुम्ही जीवनांत एकेक पाऊल पुढें टाकून सारखे प्रगत होत रहातां.

देवावर ज्यांची श्रद्धा आहे व ज्यांनीं आपल्या स्वतःस त्या ईशचरणीं सर्वस्वीं समर्पित करून टाकलें आहे त्यांच्यासाठीं तिसरी पद्धत आहे. सर्वांगांनीं, संपूर्णभावानें ते देवाचेच झालेले असतात. त्यांच्या जीवनांत जें जें कांहीं घडतें, तें परमेश्वराच्या इच्छापूर्तीचेंच स्वरूप असतें. त्या घटनांचा शांतियुक्त आत्मसमर्पणाच्या भावनेनें केवळ ते स्वीकार करतात असें नाहीं, तर त्यामध्यें त्यांची कृतज्ञतेची भावनाहि असते. कारण त्यांची खात्री झालेली असते कीं, जें जें कांहीं त्यांच्या बाबतींत घडतें तें तें सर्व त्यांच्या कल्याणाकरतांच घडत असतें. त्यांचा देव व त्याच्याशीं जडलेलें त्यांचें वैयक्तिक नातें यांविषयीं त्यांच्या मनांत एक प्रकारची गूढ श्रद्धा वसत असते. आपली स्वतःची इच्छा त्यांनीं देवाच्या इच्छेमध्यें संपूर्णपणें समर्पित करून टाकलेली असते; आणि जीवनांतील कोणतेहि अपघात वा मृत्यू यामुळें किंचितहि उणे अधिक न होणारें असें स्वयंभू प्रेम, देव आपणांस देत आहे व आपलें सतत रक्षण करीत आहे असा त्यांना अनुभव येत असतो. आपण आपल्या प्रेममय परमेश्वराच्या चरणीं संपूर्ण समर्पण-भावानें बसलों आहोंत किंवा त्याच्या बाहुपाशांत त्याच्या कृपाछात्राखालीं निवांतपणें सुखानें पहुडलों आहोंत असा त्यांना सतत अनुभव येत असतो. म्हणून त्यांच्या जाणीवेमध्यें आतां कसल्याच प्रकारच्या भीतीला, काळजीला किंवा अस्वस्थतेला जागा नसते. स्थिरता व सदा-नंदी वृत्ति यांनीं त्यांचें अंतरंग भरून गेलेलें असते.

पण असा साक्षात्कार होण्याचें भाग्य सर्वांनाच लाभत नाहीं.

शेवटीं, जन्मतःच लढाऊ वृत्तीचे असे कांहीं लोक असतात. जीवन जसें आहे तसें ते कधींच स्वीकारत नाहींत. अमरत्व–सर्वांगीण आणि इहलोकींचेंहि, अमरत्व–हा आपला अधि-कार आहे ही भावना त्यांच्या नसनसांतून स्पंदत असल्याचा त्यांना अनुभव येत असतो. त्यांना जणुं सहज प्रवृत्तीनेंच ज्ञान झालेलें असतें, कीं मृत्यु ही एक केवळ वाईट संवय आहे, ते जणुं मृत्यूस जिंकण्याच्या निश्चयानेंच जन्माला आलेले दिसतात. ही मृत्यूवरील चढाई म्हणजे भयानक व अदृश्य स्वरूपाच्या अगणित शक्तींशीं सतत, प्रत्येक क्षणीं चाललेलें जणुं एक घनघोर युद्धच असतें. ज्यांच्या ठायीं अकुंठ धैर्य वसत असतें त्यांनींच केवळ या लढाईचें साहस करावें. ही लढाई अनेक रणांगणांवर चाललेली असते. एकमेकांवर आधारलेल्या व एकमेकांत घुसलेल्या अनेक भूमिकांवर ही लढाई द्यावयाची असते.

पहिल्या प्रथम जी लढाई द्यावयाची असते ती महाभयंकर असते. तिचें क्षेत्र असतें मन. मृत्यूविषयक कल्पनेविरुद्ध ही लढाई असते. पण ही कल्पना सामूहिक, व्यापक स्व-रूपाची व मनावर अति दडपण आणणारी असते; हजारों वर्षांच्या अनुभवावर आधारलेली, आजवर कधींच अपवाद न दिसलेल्या, सृष्टीच्या निर्घृण कायद्यावर आधारलेली मृत्यूच्या अटळपणाची ही कल्पना असते. या विरुद्ध मनास प्रथम लढाई द्यावयाची असते. "मृत्यु हा अटळ आहे आणि त्यापेक्षां कांहीं वेगळें घडणें अशक्य आहे. तशी आशा करणें अगदीं वेडेपणाचें आहे, असें हें नेहमींच घडत आलेलें आहे. यापेक्षा वेगळें असें घडणें अगदीं अशक्य आहे" असें, ही कल्पना ठांसून सांगत असते. ही गोष्ट आजपर्यंत सर्वांनींच एकमुखानें मान्य केली आहे आणि आजपर्यंत मोठ्या ज्ञानी व्यक्तींपैकीं सुद्धां क्वचितच कोणीं याविरुद्ध बोल-

ण्याचें किंवा भविष्यकाळीं तसें होईल असें म्हणण्याचें धारिष्ट केलें असेल. धर्मासंबंधीं पाहतां, बहुतेक सर्व धर्मांनीं मृत्यु ही घटना गृहीतच धरली आहे. देवानें मानवास मर्त्य म्हणून, नश्वर म्हणून जन्माला घातला असल्यामुळें त्यानें मेलें पाहिजे अशीच देवाची इच्छा आहे, असें त्यांनीं प्रतिपादन केलें आहे. पुष्कळ धर्मांनीं तर मृत्यु म्हणजे मुक्ति, दुःखांतून सुटका व कधीं तर तें पारितोषिक आहे, असें म्हटलें आहे. धर्माची आज्ञा असते, "परमेश्वराच्या इच्छेसमोर नम्र व्हा; मृत्यूची कल्पना कोणत्याहि प्रकारचें आंतरद्वंद्व होऊं न देतां स्वीकारा; म्हणजे तुम्हाला सुख व शांति यांची प्राप्ति होईल.–" हें सर्व असूनहि तुमच्या मनाची जी खात्री झाली आहे तिच्याशीं तुम्हीं दृढतेनें चिकटून राहिलें पाहिजे, आणि कधींहि न वांकणारें कणखर इच्छाबल टिकवलें पाहिजे. अर्थात् मृत्यूस जिंकण्याची ज्यांनीं प्रतिज्ञाच केलेली असते, त्यांच्या मनावर या सूचना-संस्कारांचा कांहींहि परिणाम होत नाहीं; व दृढ पायावर आधारलेल्या आंतरिक अनुभूतीमुळें त्यांच्या मनाला जी निश्चिति आलेली असते तिला ही कल्पना स्पर्शहि करूं शकत नाहीं.

दुसरी लढाई असते भावनांशीं. आपण निर्मिलेल्या व आपणांस प्रिय वाटणाऱ्या गोष्टीसंबंधीं आपणांस जी आसक्ति असते तिच्याविरुद्ध ही लढाई असते. अश्रांत कष्ट करून, कधींकधीं अनंत प्रयत्न खर्ची घालून तुम्ही घर बांधलेलें असतें, नांवलौकिक मिळविलेला असतो. सामाजिक, साहित्यविषयक, कलाविषयक, शास्त्रीय अथवा राजकीय कार्य उभारलेलें असतें; तुम्ही ज्याचें केंद्र बनला आहांत अशी एक विशिष्ट परिस्थिति, वातावरण तुम्ही निर्माण केलेलें असतें. या भोंवतालच्या गोष्टी तुमच्यावर जितक्या अवलंबून असतात तितकेंच तुम्हीहि त्यांच्यावर अवलंबून असतां. नातेवाईक, मित्रमंडळी, सहकारी यांचें गोतावळें तुमच्याभोंवतीं असतें आणि तुमच्या जीवनाचा जेव्हां तुम्ही विचार करतां तेव्हां असें दिसून येतें, कीं तुमच्या स्वतःइतकेंच त्यांनींहि तुमचें विचारक्षेत्र व्यापलेलें आहे. इतकें कीं, जर एकाएकी ते तुमच्यापासून दूर झाले तर तुम्ही 'स्वतःलाच मुकलांत', असें तुम्हांस वाटतें. जणुं तुमच्या अस्तित्वाचेंच महत्वाचें अंग गळून पडल्याप्रमाणें तुम्हांस वाटतें.

या सर्व गोष्टी सोडून देण्याचा येथें प्रश्न नाहीं. कारण निदान पुष्कळ प्रमाणांत तरी तुमच्या अस्तित्वाचा आधार, तुमच्या जीवनाचें ध्येय या गोष्टींनीं घडविलेलें असतें. जें काय सोडावयाचें आहे तें म्हणजे या गोष्टींविषयींची आसक्ति. म्हणजे त्यांच्यावांचून आपण राहूं शकतो याची तुम्हांला जाणीव होईल. किंवा समजा, या गोष्टी तुम्हांपासून दूर गेल्या तर त्यावेळीं नवीन परिस्थितीमध्यें, अनंत काळपर्यंतहि नवीन जीवन-रचना करण्यास तुम्ही तयार असाल, समर्थ असाल; कारण अमरत्वाची हीच तर खूण आहे, त्याचा हा परिणाम आहे. या अवस्थेचें वर्णन असें करतां येईल कीं सर्व गोष्टी जास्तींत जास्त काळजीपूर्वक, पूर्ण लक्ष देऊन करावयाच्या व त्यांच्यांत सुसूत्रता आणावयाची आणि असें असूनहि वासना किंवा आसक्ति यांपासून मुक्त रहावयाचें. कारण मृत्यूपासून सुटका व्हावी अशी तुमची इच्छा असेल तर कोणत्याहि विनाशी वस्तूनें तुम्ही बद्ध असतां कामा नये.

भावनांनंतर येतें संवेदनांचें क्षेत्र. येथें द्यावयाची लढाई निर्दयपणानें द्यावी लागते आणि शत्रू तर दांडगा असतो. तुमच्या ठिकाणच्या लहानांत लहान दौर्बल्याचेंहि ज्ञान त्यांना असतें आणि तुम्ही थोडेसें जरी बेसावध राहिलांत तरी तेवढ्यांत ते तेथें हल्ला करतात.

त्यांच्यावर तुम्ही कधीं विजय मिळविला तरी तो टिकाऊ नसतो. एकसारखी आणि अगणित स्वरूपांत तीच ती लढाई परत परत खेळावी लागते. एकाद्या शत्रूस नामोहरम केल्यासारखें तुम्हांस वाटतें. पण तोच शत्रू पुनः उभा राहून तुमच्यावर आघात करतो. याकरतां तावून सुलाखून कणखर झालेलें शील तुम्हीं संपादन केलें पाहिजे व अश्रांत अशी सहनशीलता तुमच्याठिकाणीं असावयास पाहिजे. म्हणजे सर्व प्रकारचे पराजय, निराशा, निरुत्साह यांतून, व दैनंदिन अनुभव आणि जगांत घडणाऱ्या घटना यांच्या परस्परविरोधांतून उत्पन्न होणारा आत्यंतिक शीण यांमधून तुम्ही पार पडूं शकाल.

आतां अगदीं भीषण लढाईचें क्षेत्र येतें. अगदीं जड भौतिक क्षेत्रामध्यें, स्वतःच्या देहामध्यें ही लढाई करावयाची असते. या लढाईंत विसांवा नाहीं किंवा तह नाहीं. मानवाच्या जन्माबरोबर ही लढाई सुरू होते आणि परिवर्तनकारी शक्तीचा किंवा शरीर विदीर्ण करणाऱ्या ध्वंसनशक्तीचा, दोहोंपैकीं एका योद्धयाचा पराभव होऊनच ती संपते. ज्या क्षणीं या जगांत तुमचें आगमन होतें त्या क्षणापासूनच या दोन शक्तींचा झगडा चालूं असतो; म्हणूनच तुमच्या जन्मापासूनच ही लढाई सुरू होते असें मीं म्हटलें. अर्थात् हा झगडा मुद्दाम व जाणीवपूर्वक असा पुष्कळच उशीरा सुरू होतो; कारण शारीरिक अस्वास्थ्य, रोग, व्यंग, व अपघात सुद्धां या विघटन करणाऱ्या शक्तीच्या कार्याचा परिणाम असतो. तर उलट, वाढ, सर्वांगांचा समतोल विकास, प्रतिकारक्षमता, रोगनिवृत्ति, शारीर क्रिया पुनरपि पूर्ववत् चालूं होणें, प्रगतीच्या दृष्टीनें आवश्यक त्या सर्व क्रिया घडणें, हा सर्व रूपांतरकारी शक्तीच्या कार्याचा परिणाम असतो. परंतु पुढें मग जेव्हां आपल्या जाणीवेचा पुरेसा विकास होतो तेव्हां मात्र ही लढाई जाणून बुजून सुरू होते आणि या दोन शक्तींमधील संघर्षाला अगदीं निकराचें, उन्मत्त शक्तींमधील लढ्याचें स्वरूप येतें. कोणती शक्ति आपलें इच्छित कार्य प्रथम पुरें करते, परिवर्तन कीं मृत्यु, याबद्दल त्यांच्यांत जणु चढाओढ सुरू होते. अशा परिस्थितींत आपण अविरत प्रयत्न केले पाहिजेत; संजीवनकारी शक्तीला आपणांमध्यें उतरविण्यासाठीं सारखें एकाग्र राहिलें पाहिजे. ही शक्ती ग्रहण करण्याची क्षमता प्रत्येक पेशीमध्यें वाढविली पाहिजे. विनाशकारी व विघटन करणाऱ्या शक्ती जें विघातक कार्य करीत आहेत त्याविरुद्ध दर पावलागणिक, बिंदु बिंदुच्या अंतरागणिक लढाई केली पाहिजे. उन्नत होण्यास उत्सुक असलेला प्रत्येक भाग या शक्तींच्या मगरमिठींतून सोडविला पाहिजे. त्यांना प्रकाश दिला पाहिजे; त्यांचें शुद्धीकरण केलें पाहिजे; त्यांना सुस्थिरता आणली पाहिजे. हा लढा अति चिवट असून त्याच्या स्वरूपाचा अंदाज येणें कठीण असतें. वर वर पाहतां, पुष्कळ वेळां, कांहींहि फलनिष्पत्ति झालेली दिसत नाहीं. कांहीं प्रमाणांत विजय मिळाला तरी त्याचीं चिन्हें वरून कांहींहि दिसत नाहींत. शिवाय या विजयाविषयीं खात्री पण देतां येत नाहींच. पुनः पुनः तेंच तें कार्य करणें भाग असतें. एकीकडे एक पाऊल पुढें पडलें तर त्याची भरपाई म्हणून जणुं दुसऱ्या कोठेंतरी, पीछेहाट होत असते. एका दिवशीं जें कांहीं संपादन केलें असेल त्याचा दुसरे दिवशीं नाश झालेला दिसूं शकतो. अर्थात् जर सर्व आघाडीवर विजय मिळविला असेल तरच तो निश्चित, खात्रीपूर्वक, टिकाऊ स्वरूपाचा होऊं शकतो; कित्येक वर्षें तशींच निघून जातात व विरुद्ध शक्तींचा जोर वाढतच जातो. तरीपण 'चेतना' ही या सर्ववेळीं एखाद्या पहारेकऱ्याप्रमाणें दक्षतेनें या लढाईच्या खंदकांत सर्व कांहीं पहात राहिलेली

असते. तुम्हीं मात्र वाटेल तें झालें तरी बळकट धरून ठेवलें पाहिजे, चिकटून राहिलें पाहिजे. भीतीचा लवलेशहि मनांत येऊं देतां कामा नये; किंवा सावधानता किंचितहि कमी होऊं देतां कामा नये. तुम्हाला नेमून दिलेल्या महत्कार्याविषयींची श्रद्धा अविचल राखली पाहिजे. परमेश्वराकडून मदत होणारच, तो स्फूर्ति देणारच व आपणांस या निकराच्या लढाईंत टिकविणारच अशी अचल श्रद्धा ठेवली पाहिजे. कारण जे आत्यंतिक सहनशील असतात त्यांनाच विजय प्राप्त होतो.

मृत्युभय जिंकण्याचा आणखीहि एक मार्ग आहे. परंतु तो मार्ग इतक्या थोडया व्यक्तीं-च्या आवांक्यांत येणारा आहे कीं केवळ एक माहिती म्हणूनच त्याचा येथें उल्लेख केला आहे. हा मार्ग म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूच्या राज्यांतच मुद्दाम व जाणीवपूर्वक प्रवेश करावयाचा; व तोहि शरीर विद्यमान्, जिवंत ठेवून; आणि मग तेथून परत पूर्वीच्याच देहांत प्रवेश करून, संपूर्ण ज्ञानसंपन्न असतांना भौतिक जीवनास पुनः प्रारंभ करावयाचा. परंतु या मार्गानें जाव-याचें तर त्याला अधिकारी व्यक्तीकडून दीक्षा मिळालेली असली पाहिजे.

——श्रीमाताजी

CWMCE - Volume 02 : Page 82

---

# श्रीमाताजींचीं प्रवचनें

१

### शांतीमधून ज्ञान घेण्यासाठीं आम्हीं आमचें मन कोठें एकाग्र केलें पाहिजे ?

तुम्ही जेव्हां 'ध्यान' करतां,——येथें ध्यान शब्द वापरला असला तरी तुमच्या विचारांची दिशा वर मस्तकाकडे न्यावयाची असा अर्थ अभिप्रेत नाहीं.——एकाच जागीं एकाग्र होणें, विशेषतः जेथें अभीप्सा नांदतें, अभीप्सेची ज्योत तेवत असते त्याजागीं, हृदयाचें ठिकाणीं मन एकाग्र करणें अधिक श्रेयस्कर. तुमच्या साऱ्या शक्ती तेथें केंद्रित करा. तेथेंच सूर्यचक्र आहे. अति सूक्ष्म शब्द तुम्हांला जणुं ऐकावयाचा आहे अशा लक्षपूर्वक शांतियुक्त मनःस्थि-तींत स्थिर व्हा. समग्र लक्ष लावण्याची अत्यंत आवश्यकता असलेलें कांहींतरी आपण ऐकत आहोंत असें समजा. पूर्ण एकाग्रता, सर्वांगीं शांति नांदवा. यत्किंचितहि हलूं नका. स्थिर रहा. विचार थांबवा. पूर्ण रिक्त होऊन, जें कांहीं घेतां येईल तें सर्व ग्रहण करण्यासाठीं केवळ खुलें रहा. पण ही ग्रहण करण्याची क्रिया घडत असतांना 'हें काय घडत आहे बरें ?' हें जाणून घेण्याचा प्रयत्न करूं नका. कारण जेव्हां कांहीं जाणावयाचें असतें किंवा कांहीं सक्रिय निरीक्षण करावयाचें असतें तेव्हां मेंदूमध्यें एक प्रकारची हालचाल सुरु होते; आणि ही हालचाल तुमच्या ग्रहणक्षमतेंत कमतरता आणते. म्हणून शांतता धारण करा, शक्य तितकें पूर्ण शांत व्हा; पूर्ण लक्ष देण्यासाठीं एकाग्रता करा आणि निश्चल, स्थिर रहा.

हें सर्व तुम्हांला साधलें म्हणजे जेव्हां तुम्ही चिंतनांतून, ध्यानांतून उठतां तेव्हां, लागलीच नव्हे, तर थोडचा काळानंतर तुमच्यामधून कांहींतरी वर येतें, अगदीं अभिनव असें कांहींतरी तुमच्या जाणीवेमध्यें प्रवेश करतें. नवीन आकलनशक्ति, किंवा वस्तुमात्राचें रसग्रहण करण्याची अभिनव दृष्टि तुम्हांला लाभते; जीवनाकडे पहाण्याची एक नवीन दृष्टि तुम्हांस प्राप्त होते. थोडक्यांत म्हणजे तुमची घडणच बदलते. जीवनास नवेंच रूप येतें. अर्थात् ही घडण वा रूप तात्पुरतेंच असूं शकेल; पण या तात्पुरत्या घटनेनें सुद्धां ज्ञानाच्या व रूपांतराच्या मार्गावर एक पाऊल पुढें पडतें. दिव्य दर्शन, सत्याचें खरें स्वरूप जाणणारी अथवा त्याच्या अगदीं सन्निध पोंचणारी आकलनशक्ति किंवा तुमची मानसिक प्रगति साधण्यास मदत करणारें रूपांतरसामर्थ्य असें कांहींहि त्याचें स्वरूप असेल; किंवा त्यामुळें तुमचें जाणीवक्षेत्र विस्तृत होईल, तुमच्या मनोवृत्ती व बाह्यक्रिया यांवर अधिक प्रभुत्व तुम्हांला प्राप्त होईल.

अर्थात् या गोष्टी कधींच ताबडतोब मिळत नाहींत. मीं सांगितलेंच कीं त्या ताबडतोब मिळविण्याचा तुम्ही प्रयत्न कराल तर त्यायोगें तुमच्या ठिकाणीं एक प्रकारची क्रिया चालू रहाते आणि ही क्रिया, क्षुब्धता, खऱ्या ग्रहणक्षमतेस अगदीं अपथ्यकर असते.

तुम्ही शक्य तितकें निर्लिप्त, निश्चल, निष्क्रिय राहिलें पाहिजे. सतत तेवणारी निःशब्द आकांक्षा त्यामागें असली पाहिजे. ही आकांक्षा शब्दांमध्यें, कल्पनेमध्यें किंवा भावोर्मीमध्यें व्यक्त झालेली असूं नये; तर जी कशाची तरी उत्कंठेनें वाट पहात आहे पण कोणताच आकार जिला मिळालेला नाहीं असें तुमच्या आकांक्षेचें स्वरूप असावें. कोणत्याहि प्रकारें जाणून घेण्याचा प्रयत्न तेथें असतां कामा नये.

सुरुवातीला साहजिकच ही अवस्था लवकर अथवा सहजासहजीं तुम्हांला येणार नाहीं. तुम्हीं सावकाशपणें तुमचें मन शांत केलें पाहिजे. जाणीवेचे सर्व धागेदोरे एकत्र गोळा करून तुम्हीं एकाग्र झालें पाहिजे. याच्या पूर्वतयारीसाठींच मुळीं तुमचा तीन चतुर्थांश वेळ कदाचित खर्च होईल; पण थोडा अभ्यास वाढल्यावर, तुम्ही म्हणाल तेव्हां, कांहीं क्षणांच्या अवधींतहि तुम्हांला ही एकाग्रता साधूं शकेल.

अर्थात् यापेक्षांहि उच्चतर अवस्था अजून आहेतच; त्या अवस्था पूर्णत्वाच्या अधिक नजीकच्या आहेत. पण त्या पुढें येतील. ही उत्कंठित व एकाग्र शांति जरी तुम्ही मिळवूं शकलांत, तरी या ध्यानाच्या उपक्रमाचा पूर्ण लाभ तुम्हीं मिळविलांत असें म्हणतां येईल.



२

**कांहीं माणसें अशीं असतात कीं त्यांच्या बाबतींत सर्व कांहीं सोपें असतें तर दुसरे कांहीं लोक असें असतात कीं अत्यंत कष्टदायक अडचणींनीं ते गांजले जातात, अधिकाधिक अंधःकारांत सांपडले जातात. असा हा फरक कां ?**

दुसरे काय करतात, याविषयीं विचार करून उगीच स्वतःस त्रास कशाला करून घेतां ? ही गोष्ट तुम्हांला पुनः पुनः सांगण्याची माझी इच्छा नाहीं. दुसऱ्यांचें मूल्यमापन करूं नका, कोणावर टीका करूं नका, कोणाची कोणाशीं तुलनाहि करूं नका. कारण

तो तुमचा प्रश्नच नाहीं. भौतिक देह देऊन एका निश्चित उद्देशानें तुम्हांला या पृथ्वीवर धाडलेलें आहे. हें शरीररूपी साधन अधिकांत अधिक कार्यक्षम, परिपूर्ण करणें, भगवंताविषयीं शक्य तितकी जाणीव त्यामध्यें निर्माण करणें हा उद्देश आहे. मानसिक, प्राणिक अथवा भौतिक क्षेत्रामध्यें भगवंताच्या कार्यसिद्धीस उपयुक्त असें जडद्रव्य, साहित्य ठराविक प्रमाणांत तुम्हांला दिलेलें आहे. जीवनांत जे जे प्रसंग तुमच्यासमोर येतात ते सर्व भगवंताच्या इच्छापूर्तीकरितां, तुमचे जें कर्तव्य असतें तें करण्यास तुम्हांला संधि देण्याकरितां आलेले असतात. म्हणून असें उद्गार कधींहि काढूं नका, "माझे जीवन किती भयंकर ! कोणाच्या वांटणीस आलें नसेल असलें अभागी जीवन मला मिळालें आहे." कारण, प्रत्येकाच्या सर्वांगीण विकासाला अनुरूप व अनुकूल असेंच जीवन प्रत्येकाला दिलेलें असतें. संपूर्ण विकासाला साह्यकारी असेच अनुभव प्रत्येकाला या जीवनामध्यें मिळत असतात. तसेंच अडचणी आणि संकटें सुद्धां या सर्वांगीण कार्यसिद्धीकरतां आवश्यक असतील तेवढींच येत असतात.

स्वतःचें सूक्ष्म निरीक्षण केलें असतां, तुम्हांला असें दिसून येईल कीं, तुम्हांला जे गुण प्राप्त करून घ्यावयाचे आहेत त्याच्या अगदीं विरुद्ध टोंकाचेहि गुण अथवा संस्कार तुमच्या ठिकाणीं असतात. अत्यंत व्यापक आणि उच्च अर्थानें मीं 'गुण' हा शब्द येथें वापरत आहे. कांहीं विशिष्ट हेतु, विशिष्ट कार्य अथवा सिद्धि प्राप्त करण्यासाठीं तुमचा जन्म असून त्या सिद्धीस सर्वांगपूर्णत्व येण्याच्या दृष्टीनें आवश्यक असलेल्या सर्व अडचणींचीं बीजेंहि तुम्ही बरोबर घेऊन आलेले असतां. अंधःकार आणि प्रकाश दोन्हींहि एकाच वेळीं नेहमीं तुमच्याठिकाणीं वसत असतात, हें तुमच्या ध्यानीं येईल. तुमच्याठिकाणीं सामर्थ्य असतें पण त्याचवेळीं असामर्थ्याचीहि जाणीव तुम्हांमध्यें असते. ज्यावेळीं अति घनदाट अंधःकारानें तुम्ही वेढले जातां तेव्हां हें निश्चित समजा, कीं तुमच्यामध्यें कोठेंतरी महान् उज्ज्वल प्रकाश वसत आहे. या प्रकाशाचा साक्षात्कार करून घेण्यासाठीं, या अंधःकाराचा उपयोग कसा करून घ्यावयाचा हें सर्वस्वीं तुमच्यावर अवलंबून आहे.

असें म्हणूं नका, 'मी हा असाच. माझ्यामध्यें कसलाच बदल होऊं शकणार नाहीं." कारण हें म्हणणें खरें नाहीं. आज तुम्ही जसे आहांत त्याच्या अगदीं उलट तुम्हाला व्हावयाचें आहे म्हणून तर तुमची अशी आज स्थिति आहे. तुमच्या मार्गांतील अडचणीमागें जें सत्य झांकलें गेलें आहे त्या सत्यामध्यें तुमच्या अडचणींना रूपांतरित कसें करावयाचें हें शिकण्यासाठीं तर त्या तुमच्या मार्गांत आलेल्या आहेत.

याचरीतीनें म्हणतां येईल कीं आज जगाचें जें स्वरूप आहे त्याच्या अगदीं विरुद्ध असे जगाचें मूळ स्वरूप असलें पाहिजे. तसें जर नसतें तर जग बदलण्याची कांहींच आशा उरली नसती. दरी इतकी खोल आहे, अंधःकारव्याप्त आहे व निश्चेतनता इतकी सर्वव्यापी झालेली आहे कीं, त्यानें जर पूर्ण जाणीवेची, प्रबोधाची शक्यता सूचित केली जात नसेल तर सर्व प्रयत्न सोडून स्वस्थ रहाणेंच अधिक चांगलें ठरेल.

शंकराचार्य व त्यांच्याबरोबर इतरहि तत्त्वज्ञ सांगत कीं आजचें जग रहाण्याजोगें ठिकाण नाहीं; एक भ्रम या दृष्टीनें जगाकडे पहाणें श्रेयस्कर. शक्य तितक्या लवकर या भ्रमाचा त्याग करा; कारण त्या बाबतींत तुम्हांस कांहींच करणें शक्य नाहीं. पण या उलट मी तुम्हांस सांगते कीं, हें जग इतकें वाईट, इतकें अंधःकारमय, इतकें कुरूप, अचेतन, अजागृत

आहे, कष्ट, यातना यांनीं भरलेलें आहे म्हणून तर त्याचें रूपांतर होऊन सर्वश्रेष्ठ सौंदर्य, सर्वोत्तम प्रकाश, सर्वोच्च चेतना आणि परम आनंद यांचें रूप धारण करण्याचीहि त्यामध्यें शक्यता निर्माण झालेली आहे.

३

**खेळांचे सामने आपल्या प्रगतीला आवश्यक आहेत कां ?**

नीतिशिक्षणाच्या दृष्टीनें त्यांची अत्यंत आवश्यकता आहे. कारण तुम्ही सामन्यांत भाग घेतला असतांना योग्य वृत्ति राखलीत तर स्वतःच्या अहंकारावर प्रभुत्व मिळविण्यास ती एक अत्त्युत्तम संधि असते.

अर्थातच तुम्ही सामान्यच दृष्टि ठेवून, हीन वृत्ति स्वीकारून, सामान्यच रीतीनें खेळलांत, स्वतःची दुर्बलता ओलांडण्याचा प्रयत्न केला नाहींत तर मग अशा खेळांपासून तुम्हांला प्रगतीच्या दृष्टीनें कांहींच लाभ होणार नाहीं. पण जर योग्य वृत्ति ठेवून, कोणत्याहि हीन वृत्तीस वाव न देतां, महत्त्वाकांक्षा, मत्सर वा द्वेष यांच्या आहारीं न जातां, तुमच्या हातीं असेल तितके अधिकांत अधिक श्रम घेऊन, तुमच्या सामर्थ्याप्रमाणें उत्तमांत उत्तम व यशापयशाचा विचार दूर ठेवून तुम्ही खेळूं शकलांत, जिवापाड कष्ट घेत असतांहि यश मिळत नाहीं अथवा सर्व विपरीत घडत आहे असें दिसत असतांहि जर तुम्हीं आपलें मन शांत, सुस्थिर व अचल राखूं शकलांत तर त्या खेळांचा फारच उपयोग आहे. त्यामुळें या सर्व चढाओढींतून बाहेर पडतांना स्वतःवर अधिक प्रभुत्व ठेवण्याचें सामर्थ्य मिळवून तुम्ही बाहेर पडाल. असामान्य दर्जाच्या शीलसंपादनाच्या कामीं अतिशय साह्यकारी असणारा, कर्मफलाविषयींचा विराग, अनासक्ति, तुम्हांस त्यायोगें प्राप्त झालेली दिसेल. नित्याच्या क्षमतेच्या मर्यादा ओलांडून थोडेसे तरी पुढें जाण्यासाठीं विशेष प्रयत्न करण्याची प्रेरणा या चढाओढीमुळेंच तुम्हांस मिळते. इतर वेळीं सुप्त राहिलेल्या कित्येक मनोव्यापारांची जाणीव होण्याची संधि खरोखरी या चढाओढींमध्येंच तुम्हांस पुष्कळशी मिळूं शकते.

या चढाओढी व सामने म्हणजे केवळ आपल्या प्रगतीकरितां मिळालेली योग्य संधि व साधन असतात हें तुम्ही विसरतां उपयोगी नाहीं. कारण नेहमींच्याच वृत्तीनें व भूमिकेनें तुम्ही खेळत राहिलांत तर तुमचा तो वेळ वायांच गेला असें होईल. खेळण्याचेंच कशाला, तुम्ही जें कांहीं कराल त्या सर्व बाबतींत असेंच म्हणतां येईल; तुम्ही जें कांहीं करतां त्या कृतीपेक्षां, ती कृति करतांना तुमची भावना, वृत्ति काय असतें यावरच सर्व कांहीं अवलंबून आहे.

जर तुम्ही सर्वच योगी असतां, तुमच्या शक्तीच्या व क्षमतेच्या दृष्टीनें अधिकांत अधिक श्रम घेऊन, 'शक्य तितकें' काम करण्याचा प्रयत्न करून नव्हे, तर उत्तरोत्तर अधिक 'पूर्ण' काम करण्याचें ध्येय मनांत धरून जर तें तुम्ही करीत असलांत तर या चढाओढी, पारितोषिकें, प्रशस्तिपत्रकें यांची जरूरीच राहिली नसती, हें उघडच आहे. पण श्रीअरविंदांनीं लिहिलें आहे त्याप्रमाणें, लहान मुलांनीं योगी बनावें अशी अपेक्षा आपण करूं शकत नाहीं. त्यांच्या पूर्वतयारीच्या या वयांत त्यांच्या भौतिक चेतनेला प्रगतिपथावर पुढें पुढें जात रहाण्यास सतत

प्रेरणा द्यावयास पाहिजे. असा हा बालवयाचा पूर्वतयारीचा काळ कदाचित् कित्येक वर्षेहि राहूं शकेल.

मागें मीं एकदां सांगितलें होतें तेंच तुमचें उद्दिष्ट असावें. "महत्वाकांक्षा धरूं नका, विशेषतः कशाचाहि आव आणूं नका; तर प्रत्येक क्षणीं तुम्हांला जें कांहीं अधिकांत अधिक होणें शक्य असेल तें होण्याचा प्रयत्न करा." कांहींहि करत असतांना मनाची ही वृत्ति ठेवणें हेंच तुमच्या सर्वांगीण विकासास अत्यंत उपकारक ठरेल. हें जर तुम्हीं प्रत्यक्ष आचरणांत उतरवूं शकलांत तर पूर्णत्वाच्या मार्गावर तुम्ही बरीच मजल मारलीत असें म्हणतां येईल. तरीपण हें सर्व अंतःकरणपूर्वक करण्यास, आंतरिक दृष्टीनें कांहींशी प्रौढता, परिपक्वता तुमच्याठिकाणीं येणें आवश्यक आहे.

ती प्रौढता येईपर्यंत त्यासाठीं तुम्हीं कांहीं कार्यक्रम आंखून नेहमींच प्रयत्न करीत राहिलें पाहिजे.



४

**'पसंति नापसंति नसावी' याचा अर्थ काय समजावयाचा? अव्यवस्थेपेक्षां व्यवस्थेची आवड असणें, अस्वच्छतेऐवजीं स्वच्छता प्रिय वाटणें अशीहि आवडनिवड नको कां? प्रियाप्रिय नसावें याचा अर्थ असा कां, कीं सर्वांना सारख्याच नात्यानें वागवावयाचें?**

येथें ज्याला तुम्ही 'पसंती नापसंती'म्हणत आहां त्याला मी 'निवड' म्हणत आहे; आणि त्या अर्थानें पाहतां जीवनामध्यें दरक्षणींच तुम्हाला निवड करावी लागते. जें कांहीं तुम्हांस उच्चतेप्रत नेतें किंवा खालच्या पातळीवर खेचतें तसेंच जें कांहीं तुमच्या प्रगतीस साह्य करतें आणि जें कांहीं तुमच्या परागतीस कारणीभूत होतें त्या दोहोंमधून एकाची निवड तुम्हांला करावीच लागते. पण त्याला मी 'पसंतिनापसंति' केली असें म्हणणार नाहीं. अशावेळीं मी म्हणेन, सारासार, इष्टानिष्ट, नित्यानित्य विवेक माणसानें केला; आणि अशातऱ्हेचा विवेक अत्यावश्यकच आहे. भौतिक अथवा नैतिक कोणत्याहि दृष्टीनें मालिन्य आणि निर्मलत्व यां-मध्यें एकदांच कायमची निवड करून टाकणें ही गोष्ट तर याहूनहि कितीतरी महत्त्वाची आहे. ही विवेकबुद्धि मनुष्यांत नेहमीं व एकसारखी जागृत राहिली पाहिजे. तुम्हीं त्या बाबतींत कधींहि अजागृत असतां कामा नये. पण अशा या विवेकपूर्ण निवडीला मी 'पसंती नापसंती' अथवा 'आसक्ति' कधींच म्हणणार नाही.

'पसंती-नापसंती' असणें याचा अर्थ केवळ 'सारासार निवड'नसणें एवढाच आहे. माझ्या दृष्टीला 'पसंती-नापसंती' व 'सारासार विवेक' यांतील भिन्नभिन्न अर्थ स्पष्ट दिसतात. 'पसंती-नापसंती' ही आंधळेपणानें केलेली असते. ती एक 'उर्मी' आहे; 'आवेग' आहे. 'आसक्ति' आहे. कित्येकदां ती अजाण कृति असते. पुष्कळवेळां स्वभावांतून ती जातां जात नाहीं.

पुष्कळवेळां पसंती नापसंती 'ही सारासार निवडीच्या' अगदीं उलट दिशेला नेणारी असते. रोज तुम्हांला आढळणारे हे एक उदाहरण पहा. एखादी समस्या तुमच्यासमोर येते आणि खरा मार्ग दिसावा म्हणून तुम्ही स्वतःस सर्वस्वीं भगवंताच्या इच्छेच्या आधीन करतां. खरा

मार्गहि त्यामुळें तुम्हांला मिळतो. पण तुम्ही मनांत थोडेसे निराश होतां. असें कां व्हावें ? याचें कारण, तुमच्यामधील एकादा, भाग, त्यापेक्षां वेगळा कांहींतरी मार्ग मिळावा असें अंधुकपणानें अथवा स्पष्टपणानें इच्छित होता, अपेक्षा करीत होता, अधिक प्रिय समजत होता. अशी तुमच्या मनांत 'पसंती नापसंती' असते; म्हणूनच जेव्हां तुमची उत्कट अभीप्सा अथवा प्रार्थना तुमच्या अपेक्षेपेक्षां वेगळ्या रूपांत फलद्रूप होते, तेव्हां तुम्ही कष्टी होता व तें फळ स्वीकारण्याकरितां तुमच्या मनांतील द्वंद्वास तुम्हाला तोंड द्यावें लागतें. उलटपक्षीं, जर तुम्हांला 'पसंती नापसंती' कांहींच नसेल तर तुमची अभीप्सा वा प्रार्थना केव्हांहि व कोणत्याहि रूपांत फळाला आली तरी तुम्ही उत्साहानें, मनापासून, आनंदानें, तत्क्षणीं त्याचा स्वीकार करून त्यास तुम्ही चिकटून रहातां.

ज्या ज्या वेळीं असा निवडीचा प्रसंग येईल त्या त्या प्रत्येक क्षणीं तुम्हाला सारासार विवेक करणें भागच असतें. उच्चतेला चढायचें कीं खालीं उतरायचें, पुढें पुढें जायचें कीं मागेंच रहावयाचें हें तुम्हांला दरक्षणीं ठरवावयास पाहिजे. अमुक गोष्टीपेक्षां तमुक गोष्ट नेहमीं निवडायची असा ठराविकपणा या निवडीमध्यें नसतो. तर दर क्षणाला येणारा तो नवीन अनुभव असतो. तुम्हीं घ्यावयाची ती विशिष्ट भूमिका असते.

सारासार निवडीमध्यें एक निर्णय असतो व त्याप्रमाणें आचरण करावयाचें असतें. उलट पसंती नापसंतीची भावना म्हणजे एक प्रकारची वासना किंवा उर्मी असते. सारासार निर्णय हा जाणीवपूर्वक करावयाचा असतो; तसाच तो केला पाहिजे; आणि तो जर खराखुरा निर्णय असेल तर परिणामाचा त्यांत यत्किंचितहि विचार न येतां तो आपोआपच घेतला जातो. अमुक एक प्रकारचें फल येईल अशी कांहींच अपेक्षा त्यांत नसते. आंतरिक सत्यास, उच्चतर जाणीवेस अनुसरून तुम्ही तो घेत असतां. त्याचे परिणाम काय होतील हा तुमचा प्रश्नच नसतो. तुम्हीं तुमचा निर्णय घेतलेला असतो आणि तो खराखुरा निर्णय असतो. पण उलट, जर तुमच्या ठिकाणीं पसंती-नापसंती असेल तर त्याला धरूनच तुमच्याकडून निर्णय घेतला जातो. या प्रियाप्रियभावनेमुळें तुमची खरी निर्णयशक्ति पंगु बनविली जाते. अशा निर्णयांत हिशेब असतो, सौदा असतो. अशावेळीं तुम्ही जें कांहीं वर्तन करतां तें 'सत्यास धरून' 'योग्य क्रिया' म्हणून करत नाहीं, तर विशिष्ट फलाची आशा धरून तें तुम्ही करतां; अर्थात् अशाठिकाणीं कोणत्याहि प्रकारचें फल येण्याची शक्यता राहते.

पसंती-नापसंतीनें घेतलेला निर्णय हा फलाकडे पाहून घेतलेला असतो आणि सारासार निर्णय हा फलाच्या विचारापासून अलिप्त राहून घेतलेला असतो. मी पुनः सांगते,—दरक्षणीं असा प्रसंग तुम्हांसमोर असतो, कीं तुम्हांला सारासार निर्णय घेणें अगत्याचेंच असतें, पण विशिष्ट फल नव्हे, तर सत्यशोधन हें तुमचें उद्दिष्ट असल्याशिवाय तितकासा योग्य व सच्चेपणानें निर्णय घेणें तुम्हांस शक्य होणार नाहीं. फलानुरोधानें तुम्हीं निर्णय घेतलात तर तो निर्णय खोटा ठरेल.

आतां तुमच्या लक्षांत आलें असेल, तुमच्या मनांत याविषयीं कसा गोंधळ झालेला होता तो.

आतां, सर्वांना सारख्याच नात्यानें वागविण्यासंबंधीं. ही गोष्ट तर अधिकच गोंधळांत पाडणारी आहे. देवानें आपणा सर्वांशीं सारख्याच नात्यानें वागावें अशी अपेक्षा करतांना

मनानें जसा घोंटाळा केला जातो तसाच येथेंहि होतो. तसें असतें तर मग विश्वामध्यें असलेल्या वैचित्र्याचा कांहींच उपयोग नाहीं; कोणत्याहि दोन व्यक्ती एकासारख्या एक नाहींत इतकी जी विविधता आहे तीहि निरर्थकच, असें म्हणावें लागलें असतें. सर्वांशीं एकसारखें नातें अथवा संबंध राखणें म्हणजे विश्वरचनेच्या मुळाशीं असलेल्या विविधतेच्या तत्त्वाच्याच तें विरोधी करणें आहे.

विश्वांतील यच्चयावत् वस्तुमात्राविषयीं मनांत खोल जिज्ञासावृत्ति, एकत्व भावना, प्रेम, पूर्ण दयालुता, नांदविणें शक्य आहे; नांदविली पाहिजे. पण समजा, तसें शक्य नसेल तर निदान त्याकरितां मनांत अभीप्सा तरी तुम्हीं ठेवली पाहिजे. तरीपण हीच भूमिका प्रसंगभेदानें, त्याचें सत्यस्वरूप व त्यावेळची आवश्यकता यांस अनुसरून सर्व ठिकाणींच स्वीकारणें योग्य ठरेल. दुसऱ्या शब्दांत बोलावयाचें तर असें म्हणतां येईल कीं, एकाद्या कृतीचा उगम एकच असला तरी ती कृति दुसऱ्या एकाद्या प्रसंगीं, त्यावेळच्या सत्यास अनुसरून पाहतां, अगदीं संपूर्णतः परस्परविरोधीहि असूं शकेल. परंतु ही भूमिका कोणत्याहि इतर उर्मीपासून पूर्ण अलिप्त असतांना व उच्चतम, गाढतम व सारतः सत्यतम चेतनेमध्यें असतांनाच घेतां येणें शक्य असतें. त्या भूमिकेंत वस्तुमात्राचें सारभूत सत्यच केवळ नव्हे तर, प्रत्येक प्रसंगांतील प्रत्येक कृतीच्या मागील सत्याचेंहि दर्शन तुम्हांस होतें व त्यानुसार तुम्ही वागतां; आणि तरीहि, कोणाशींहि व केव्हांहि कांहीं वर्तन केलें तरी तुमची जाणीवेची पातळी, भूमिका अगदीं एकच एक, कायम असते; राहूं शकते.

ह्या भूमिकेची कल्पना येण्यासाठीं तुम्हीं वस्तूंच्या सारगर्भीं शिरलें पाहिजे, किंवा त्यांच्याकडे सर्वांत उच्च भूमिकेवरून पाहिलें पाहिजे. अशावेळीं तुम्ही प्रकाश व चेतना यांचें एक केंद्र बनता. पुरेसें उच्चतम भूमिकेवर अथवा पुरेसें खोलवर तुम्ही जाऊं शकतां व तेथून जणुं एकाच वेळीं अखिल वस्तुमात्रांस पाहूं शकतां. केवळ सारभूतरूपानें नव्हे तर त्यांच्या प्रत्यक्ष आविष्कारासहि पाहूं शकतां. तुमचें जाणीवेचें केंद्र एकच असलें तरी अभिव्यक्तीमधील दिव्यसत्याचें दर्शन घडल्यामुळें, तुमची कृति मात्र प्रत्येक अभिव्यक्तिगणिक भिन्नभिन्न प्रकारची घडते.

इतर भूमिकेवरून तसा प्रयत्न करणें म्हणजे सर्व विविधाकार जगताचा नाश करून त्याला अनभिव्यक्त निराकार स्थितींत परत नेणें होय. कारण केवळ अनभिव्यक्त स्थितींतच सर्वकांहीं एकाकार असतें. तुम्ही अभिव्यक्त सत्यामध्यें प्रवेश करतांच 'आद्य एक' 'बहु' होतें व अनेक आकारांत विलसूं लागतें; आणि अनेक आकार म्हटलें म्हणजे मग अनंत क्रिया व अनंत साधनें आलींच.

सारांश, परिणामाचा अथवा फलाचा विचार न करतां, सारासार निर्णय करावयास पाहिजे; आणि व्यक्त जगतांतील अनेकत्वांतील अनेकरूपी सत्यास अनुसरूनच तुम्ही क्रिया केली पाहिजे.

श्रीमाताजी——

CWMCE - Volume 08 : Page 405

# योग-समन्वय

## प्रस्तावना

## २

## निसर्गाचीं तीन पावलें

आतांपर्यंत झालेल्या योगाच्या प्रगतीमध्यें अशाप्रकारें एक पृथकत्वाची व एकांगिक प्राविण्याची प्रवृत्ति आपणांस दिसते. प्रकृतीच्या अन्य कोणत्याहि घडामोडींप्रमाणें ह्याचाहि एक न्याय्य व अत्यावश्यक उपयोग त्या त्या काळीं होता. त्या सर्वांतून उदयास आलेलीं वैशिष्टयपूर्ण ध्येयें व भिन्न मार्ग ह्यांचा एक समन्वय साधण्यास आपण आतां प्रवृत्त झालों आहोंत. आपला हा समन्वयाचा प्रयत्न शहाणपणानें व्हावा यासाठीं ह्या पृथकत्वाच्या मुळाशीं कोणतें सर्वसामान्य तत्त्व व हेतु दडला आहे व प्रत्येक योगमार्गाच्या पद्धतीची विशेष आवश्यकता काय आहे हयाची पुरेपुर ओळख होणें अगत्याचें आहे. ह्या सर्वसामान्य मूलतत्त्वाचा शोध घेण्यासाठीं आपणांस प्रथमतः प्रकृतीच्या जगड्व्याळ कारभाराचेंच निरीक्षण केलें पाहिजे. प्रकृतीचें हें विश्वव्यापक कार्य म्हणजे विकृत फसव्या मायेचा पोकळ पसारा नसून तें एक प्रत्यक्ष परमेश्वराचेंच कार्य आहे, प्रकृति ही त्याचीच वैश्विक शक्ति आहे. एका प्रचंड, अनंत व सूक्ष्मभेदी ज्ञानसत्तेनें प्रकृतीचें कार्य घटित व प्रेरित झालें आहे. आणि गीतेनें म्हटल्याप्रमाणें हें ज्ञान सुरुवातीपासूनच त्या सनातन तत्त्वापासून निघालेलें आहे, (प्रज्ञा प्रसृता पुराणी।) हें आपण लक्षांत घेतलें पाहिजे. आतां दुसरे पक्षीं निरनिराळ्या मार्गांच्या वैशिष्टयपूर्ण उपयुक्ततांचा विचार करतांना आपणांस भिन्न भिन्न मार्गांचें सूक्ष्म व मूलगामी अवलोकन करून त्यांच्या तपशीलाच्या पसाऱ्यांतील मध्यवर्ती कल्पना हुडकून काढली पाहिजे; व कोणत्या प्रेरक शक्तीमुळें त्यांचा जन्म झाला व त्यांच्या फलद्रूपतेचें रहस्य कशामध्यें आहे हें आपणांस पाहिलें पाहिजे. त्यानंतर मगच, कोणत्या एका समान तत्त्वापासून व शक्तीपासून त्यांची घडण झाली, नकळतपणें त्यांचा ओघ कोणत्या दिशेला वहात आहे व त्यामुळेंच कोणत्या बैठकीवर त्या सर्वांना जाणीवपूर्वक एकत्र येणें शक्य आहे हें आपणांस सहज कळून येईल.

प्रकृतीचें मानवामध्यें होणारें प्रगतीशील आविष्करण, ज्याला आधुनिक भाषेंत त्याची उत्क्रांति असें म्हणतात, ती स्वभावतःच तीन मूलभूत गोष्टींवर क्रमशः अवलंबून असते. पहिली गोष्ट म्हणजे जें तत्त्व आधींच उत्क्रांत झालें आहे त्यावर, दुसरें म्हणजे, जें जाणीवपूर्वक सतत उत्क्रांत होण्याच्या अवस्थेंत आहे त्यावर व तिसरें म्हणजे जें अजून उत्क्रांतित व्हावयाचें आहे त्यावर. परंतु हें संपूर्णतः उत्क्रांत न झालेलें उच्च तत्त्व, सतत नसले तरी

मधून मधून वा कांहीं ठराविक कालखंडानें कांहीं प्राथमिक कोटींमध्यें, अथवा अधिक विकसित कोटींमध्यें किंवा आजच्या मानवजातीला शक्य असलेली अत्युच्च सिद्धि ज्या कांहीं थोड्या तुरळक व्यक्तींना शक्य आहे अशा व्यक्तींमध्यें पुनः पुनः प्रकट झालेलें आहे. कारण प्रकृतीची चाल म्हणजे कांहीं नियमबद्ध यांत्रिक सैनिकी संचलन नव्हे. मधून मधून एकसारखी तीं जोरानें झेंप घेते, अद्‌भुत व प्रचंड उद्रेक दाखविते; मोठमोठे साक्षात्कार घडवून आणते. कधींकधीं तर आवेगांत येऊन, वायुवेगानें उड्डाण करून स्वर्लोकीचें राज्यच जणुं बळानें हिसकावूं पहातें. प्रकृतीचें हें आत्म-अतिक्रमण म्हणजे वस्तुतः तिच्यामध्यें असलेल्या अत्युच्च दैवी अथवा कधीं अत्यंत आसुरी अशा तत्त्वाचेंच द्योतक असतें. कोणत्याहि तत्त्वाचें द्योतक असलें तरी तिचें ध्येय जलद रीतीनें गांठण्याच्या दृष्टीनें तें अत्यंत प्रभावी असतें. असो.

आतांपर्यंत प्रकृतीनें जें कांहीं आपणांकरतां विकसित केलेलें आहे व दृढपणें प्रस्थापित झालें आहे तें म्हणजे शारीरिक जीवन. भूलोकावरील आपला व्यवहार व प्रगति ह्यांसाठीं अत्यावश्यक असणाऱ्या दोन कनिष्ठ पण मूलभूत तत्त्वांची विशिष्ट सांगड व मेळ आतांपर्यंत प्रकृतीनें साधलेला आहे. त्यांतील पहिलें तत्त्व म्हणजे जड-तत्त्व. नेहमीं उच्च वातावरणांत तरंगणाऱ्या कांहीं अध्यात्मवाद्यांनीं कितीहि तुच्छता दर्शविली असली, तरी हें जडतत्त्व हाच आपला पाया असून आपल्या सर्व प्रेरक शक्ती व साक्षात्कार यांना आवश्यक अशी प्रारंभिक भूमि आहे. दुसरें आवश्यक मूलतत्त्व म्हणजे प्राणशक्ति. आपल्या भौतिक शरीराच्या अस्तित्वाचें ही प्राणशक्ति हें एक साधन असून आपल्या मानसिक व आध्यात्मिक क्रियांची आपल्या भौतिक शरीरामधील मूलबैठक हीच प्राणशक्ति आहे. ह्या दोन्हीं मूलभूत तत्त्वांच्या साहाय्यानें प्रकृतीनें आपल्या सतत चालणाऱ्या आधिभौतिक घडामोडींमध्यें कांहीं एक स्थैर्य प्रस्थापित करण्यांत यश मिळविलें असून मानवजातीमध्यें क्रमाक्रमानें अधिकाधिक आविष्कृत होणाऱ्या परमेश्वराला आवश्यक तितकें स्थिर व चिरंजीवी, आणि लवचिक व परिवर्तनक्षम असें योग्य निवासस्थान व उपकरण या अधिभौतिक घडामोडींच्या द्वारां तिनें अर्पण केलें आहे. "परमात्म्यानें जीं जीं निरनिराळ्या प्राण्यांची रूपें देवांना प्रदान केलीं तीं त्यांनीं एका पाठोपाठ एक अमान्य केलीं परंतु ज्यावेळीं मनुष्य निर्माण केला त्यावेळीं, 'ह्याची घडण आतां खरोखरी परिपूर्ण झाली आहे' अशी त्या सर्वांनीं एकमुखानें गर्जना केली व त्या रूपांत प्रवेश करण्यास मान्यता दिली", अशी जी ऐतरेय उपनिषदांत आख्यायिका आहे तिचा अर्थहि हाच आहे. प्रकृतीनें पृथ्वीतत्त्वाची जडता व त्यांत रहाणाऱ्या व त्यावरच पोसल्या जाणाऱ्या प्राणतत्त्वाची कार्यशीलता ह्यामध्यें एक कामापुरती तडजोड साधली असून त्यामुळें, केवळ प्राणशक्तीचे व्यवहार चालतात एवढेंच नव्हे तर मनःशक्तीचीहि परिपूर्ण प्रगति त्यामुळें शक्य झाली आहे. ही साम्यावस्था म्हणजेच प्रकृतीनें मानवामध्यें साधलेली पायाभूत स्थिति होय; ह्यालाच योगाच्या परिभाषेंत अन्नकोश व प्राणकोश ह्यांनीं युक्त असणारे स्थूल शरीर अशी संज्ञा आहे.

अशाप्रकारची ही खालच्या पातळीवरील साम्यावस्था, हें स्थूल शरीर हीच जर त्या विश्वशक्तीनें नियोजित केलेली आधारभूमि व उच्चतर प्रक्रियांचें पहिलें साधन असेल, ज्याच्यामध्यें परमेश्वर आपला आविष्कार घडवूं इच्छितो त्यासाठीं निर्माण केलेला हाच जर रथ

असेल, 'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्' ह्या भारतीय सिद्धांतांत जर कांहीं सत्य असेल, तर मग शारीरिक जीवनापासून शेवटीं दूर नेणारी कोणतीहि पराङ्मुखता म्हणजे ईश्वरी सर्वज्ञतेचा अव्हेर करणें व परमेश्वराच्या पार्थिव-आविष्कार-ध्येयाचा त्याग करणें ठरेल. अशा प्रकारची पराङ्मुखता अथवा त्याग हा, कांहीं विशेष व्यक्तींचें बाबतींत, त्यांच्या वाढीमागील कांहीं गुप्त सूत्रानुसार योग्य वृत्ति असूं शकेल. परंतु तें अखिल मानवजातीचें ध्येय मात्र कधींच होऊं शकणार नाहीं. म्हणून, जो योग परिपूर्ण आध्यात्मिक जीवनासाठीं शरीराची हेळसांड करणें अथवा त्याचा त्याग वा धिःकार करणें अत्यावश्यक आहे असें सांगतो तो योग 'पूर्णयोग' होऊं शकणार नाहीं. किंबहुना शरीरहि पूर्णावस्थेला नेणें हाच चैतन्याचा अखेरचा विजय, अखेरचें ध्येय असलें पाहिजे व शारीरिक जीवनहि दैवी बनविणें हेंच परमेश्वराचें आपल्या विश्वकार्यावरील अखेरचें शिक्कामोर्तब असलें पाहिजे. 'आध्यात्मिक जीवनामध्यें शरीर अडथळा आणतें' ह्या म्हणण्यानें शरीरत्याग केला पाहिजे असें सिद्ध होत नाहीं. कारण दैवाच्या अदृष्ट योजनमध्यें महान् संकटें हीच अत्युत्तम सुवर्णसंधीचे रूप घेतात. महान् संकट म्हणजे महान् विजय संपादण्यासाठीं, अंतिम समस्या सोडविण्यासाठीं प्रकृतीनें केलेली खूण असते. असें संकट म्हणजे आपणांस पकडण्यासाठीं फेंकण्यांत आलेलें, ज्यांतून सुटतां येणार नाहीं असें जाळें असल्याची धोक्याची सूचना आहे असें समजून तें चुकविणें किंवा आपल्या आटोक्याबाहेरच्या शत्रूची ती खूण समजून पळून जाणें हें तर पूर्णतः चुकीचें ठरेल.

त्याचप्रमाणें आपल्यामध्यें खेळणाऱ्या प्राणशक्तींची देखील महान् उपयुक्तता आहे, आपल्या अंतिम पूर्णावस्थेंमध्यें त्या शक्तीहि त्यांच्या दैवी सिद्धीची मागणी करतात. विश्वयोजनेमध्यें ह्या तत्त्वाला देण्यांत आलेलें महान् स्थान, दिव्यज्ञानसंपन्न उपनिषदांनीं तर फारच प्रभावीपणें प्रतिपादन केलें आहे. प्रश्नोपनिषदांत (२-६.१०) असा उल्लेख आहे कीं, "चक्रांच्या अऱ्या ह्या ज्याप्रमाणें चक्रनाभीमध्यें बसविलेल्या असतात तद्वतच त्रैविद्या, यज्ञ, क्षात्रतेज, ब्रह्मतेज..हीं सर्वच ह्या प्राणशक्तीच्या आधारानें विद्यमान् असतात. या त्रिविध प्रकाशमय लोकांत जें जें प्रस्थापित झालेलें आहे तें या मूलप्राणशक्तीच्या पूर्णपणें ताब्यांत आहे." म्हणून या प्राणशक्तींना नष्ट करणें, त्यांना थंड करून क्रियाशून्य करणें, अथवा सर्व उपद्रवी व्यापारांचें मूळ समजून त्यांस उखडून टाकणें हें जो योग करतो तो 'पूर्णयोग' होऊंच शकत नाहीं. त्यांना नष्ट न करतां विशुद्ध करणें, परिवर्तित करणें, व त्यांवर सत्ता संपादन करून त्यांचा उपयोग करून घेणें हें ध्येय आपल्या डोळ्यांसमोर ठेवून, आपल्याठिकाणीं त्या निर्माण व विकसित केल्या गेल्या आहेत.

शारीर-जीवन हा आपल्यामध्यें प्रकृतीनें दृढपणें विकसित केलेल्या पाया व प्राथमिक साधन म्हटलें, तर मानसिक जीवन हें त्यापुढची पायरी व त्याहूनहि उच्च असें साधन ती विकसित करीत आहे. तिच्या सामान्यतः नेहमींच्या उल्हासामध्येंहि तिच्या मनामध्यें सतत खेळत असलेला उदात्त ध्येय-विचार ह्या मनोविकासाचाच असतो. त्याचप्रमाणें दमून-भागून गेल्यामुळें पुनः उत्तेजित होण्यासाठीं प्रकृतीनें स्वीकारलेला निद्रित व अर्धजागृतीचा कालखंड सोडला तर अन्यप्रसंगीं ज्या ज्या वेळीं आपल्या आधींच थाटलेल्या शारीरिक व प्राणमय संसाराच्या दगदगीमधून फुरसत काढतां येईल त्यावेळीं प्रकृति आपल्या ह्याच नूतन ध्येयसाधनेंत मग्न असलेली आपणांस आढळून येते. अशाप्रकारें चालणाऱ्या ह्या साधनेच्या

सातत्याचें कारण मनुष्यामध्यें असणाऱ्या एका विशेष महत्त्वाच्या वैशिष्टयांत आपणांस आढळून येते. मानवामधील मानसिक अवस्था केवळ एकाच प्रकारची नसून दुहेरी अथवा तिहेरी आहे—त्याच्यामध्यें भौतिक व प्राणमय मन; शरीर व इंद्रियें ह्यांच्या भ्रमापासून मुक्त होणारी विशुद्ध बुद्धि व तर्कांचा कीस काढणाऱ्या कल्पनामय बुद्धीच्या अपूर्ण व्यापारांतून स्वतःस मुक्त करून घेणारे बुद्धीच्या पलीकडे असणारें दिव्य मन असतें. माणसाचें मन हें प्राथमिक स्थितींत शारीरिक जीवनांत गुरफटून गेलेलें असतें. वनस्पति सृष्टींत तर तें पूर्णतःच अंतर्लीन झालेलें असते आणि प्राणिसृष्टींत नेहमीं बंदिस्त असतें. तें मन ह्या शारीरिक जीवनास आपल्या सर्व व्यापारांचें केवळ प्राथमिकच नव्हे, तर एकमात्र क्षेत्र समजतें व जणुं कांहीं अखिल अस्तित्वाचा तोच हेतु आहे असें समजून त्याच्याच गरजा पुरवत बसतें. परंतु मनुष्याचें शारीरिक जीवन हा पाया असला तरी तें त्याचें ध्येय मात्र नव्हे. ती प्राथमिक आवश्यकता असली तरी अखेरची निर्णायक स्थिति नव्हे. पूर्वजांच्या त्या यथायोग्य दृष्टीनुसार मानव म्हणजे विचारवंत, मनु. 'मनोमयः प्राणशरीरनेता'—शरीरानें व मनानें हांकारलेलें जनावर नव्हे. म्हणून मानवी अस्तित्व, मानवाचें खरें जीवन, तेव्हांच सुरु होतें कीं ज्यावेळीं मन, बुद्धि हीं भौतिकतेमधून बाहेर पडतात, शारीरिक व प्राणमय अडथळ्यांतून पार पडतात व मनुष्य स्वतंत्र असें मानसिक जीवन अधिकाधिक जगूं लागतो आणि त्या स्वातंत्र्याच्या प्रमाणांत शारीरिक जीवनाचा योग्य रीतीनें स्वीकार करून त्याचा योग्य उपयोग करूं शकतो. कारण चतुर मंत्रिपद हें कांहीं स्वामित्वाचें पदचिह्न नव्हे तर स्वातंत्र्य हेंच प्रभुत्वाचें खरें साधन आहे. जन्मजात परिस्थितीची पाशवी ताबेदारी हें मनुष्याचें ध्येय नसून आपल्या भौतिक जीवनाच्या अतिव्यापक व उदात्त परिस्थितीचा स्वतंत्रपणें स्वीकार करणें हेंच मानवाचें उच्च ध्येय आहे.

अशाप्रकारें उत्क्रांत झालेलें मानसिक जीवन हा कांहीं मानव जातीचा अजून सार्वत्रिक वारसा झालेला नाहीं. प्रत्यक्ष अनुभव पाहतां, कांहीं तुरळक व्यक्तींमध्येच संपूर्ण मानसिक वाढ झालेली आपणांस दिसते; व इतरत्र फार मोठ्या संख्येंत तरी वाढ फारच अल्प झालेली वा खुरटलेली अथवा अव्यवस्थित अशी आढळून येते. कित्येक ठिकाणीं ती मुळींच दिसून येत नाहीं; निदान ती प्रत्यक्षांत कार्यकारी नसून फक्त सुप्त स्थितींतच असते. अर्थात् प्रकृतीच्या उत्क्रांतीच्या क्रमांत मानसिक जीवन अजून पूर्ण साध्य झालेलें नाहीं, हें निश्चित आहे. मानव-पशूंत अजून त्याचा पाया भक्कमपणें घातला जावयाचा आहे; त्याची स्पष्ट खूण ही आहे कीं शरीर व प्राणशक्ति यांचा सुंदर व संपूर्ण मेळ, खणखणीत निरोगी दीर्घायुष्य, सामान्यतः अशा जमातींमध्यें व माणसांमध्यें दिसून येतें कीं जे आपल्या विचारशक्तीस बिलकुल ताण द्यावयास तयार नसतात; व त्यांतून उत्पन्न होणारे अडथळे व खेंचाखेंच झुगारून देऊन केवळ भौतिक मनाच्या सल्लयानेंच चालतात ; सुसंस्कृत माणसाला पूर्ण कार्यक्षम मन व शरीर यांच्यामध्यें अजून समझौता घडवावयाचा आहे. अजून ती त्याची स्वाभाविक स्थिति व्हावयाची आहे. खरोखरी पाहतां मानसिक जीवनांतच जास्त दंग होण्याच्या प्रयत्नानें मानवी घटनेमध्यें अधिकच विसंवाद निर्माण होतो असें दिसून येतें. हा विसंवाद कांहींवेळां इतका असतो कीं कांहीं थोर शास्त्रज्ञांना, अलौकिक बुद्धिमत्ता, प्रतिभासंपन्नता (genius) हा एक वेडाचाच प्रकार असून, तो एक अवनतीचा परिणाम व निसर्गांतील विकृत रोग आहे, असें

वाटावें अशी परिस्थिती उत्पन्न झाली आहे. या अतिशयोक्तीचें समर्थन करण्यासाठीं जो बाह्य पुरावा सादर करण्यांत येतो त्याचें पृथक् विश्लेषण न करतां सर्व संबंधित तपशिलासह जर त्याचा अभ्यास केला, तर मात्र एक निराळेंच सत्य उघड होऊं लागते. प्रतिभासंपन्न व्यक्ति निर्मिण्यामध्यें विश्वव्यापक चैतन्यशक्तीचा असा प्रयत्न दिसतो कीं आपल्या बौद्धिक शक्तींचा तीव्र व जलद उपयोग करून त्याच्या साह्यानें विचार शक्तींत, तिच्या पलीकडे असणाऱ्या दिव्यमनाचें सामर्थ्य आणि प्रत्यक्ष व सहज ज्ञानाची वेगवान् शक्ति ग्रहण करण्याची क्षमता उत्पन्न करावी. प्रतिभासंपन्नता ही अशाप्रकारें एक चमत्कारिक घटना वा लहरी उद्रेक नसून विकासक्रमाच्या सरळ वाटचालींतील तें स्वाभाविक असें एक पुढचें पाऊल आहे. प्रकृतीनें शारीरिक जीवन व भौतिक मन ह्यांची सांगड घातलेली आहे; आतां वैचारिक मनाच्या क्रियांशीं ती तें सुसंवादी करूं पहात आहे. त्यामुळें पशूंमध्यें आढळणारी जोरदार प्राणशक्ति माणसांत खच्ची झाल्यासारखी वाटत असली तरी प्रत्यक्ष मार्गांत कांहीं त्यामुळें अडथळा येत नाहीं. वास्तविक, प्रकृति तर अजूनहि पुढचें पाऊल टाकण्यासाठीं, अधिक उच्चतर पातळी गांठण्यासाठीं उद्युक्त झाली आहे. शिवाय तिच्या ह्या मार्गक्रमणामध्यें आलेले अडथळे खरो-खर जेवढे दाखविण्यांत येतात तेवढे कांहीं नाहींत. त्यांतील कांहीं उदाहरणें तर नूतन आवि-ष्काराची प्राथमिक अवस्था दर्शवितात आणि दुसरीं कांहीं उदाहरणें सहज सुधारतां येण्या-सारख्या विसंवादाचीं आहेत. शिवाय या सर्व गोष्टींचा मानवजातीस बरेंचवेळा लाभ होण्या-सारखा असून तिच्यासमोर असलेल्या ध्येयाच्या दूरगामी परिणामांच्या मानानें ही किंमत फारच अल्प आहे. (अपूर्ण)

—श्रीअरविंद

---

# धीर व चिकाटी

(विद्यार्थ्यांसाठीं)

पंजाबी लोकांचें एक गाणें आहे,

सदा ना बागीं बुलबुल बोले, सदा ना बाग बहारां।
सदा ना राज खुशी दे होंदे, सदा न मजलिस यारां॥

गाण्याचा भाव हा आहे कीं, नेहमीं आपल्याच मनाप्रमाणें गोष्टी घडत रहातील अशी अपेक्षा आपण करूं शकणार नाहीं; धीर धरण्यास शिकणें हीच तर जीवनांत अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. कारण जीवनांत आपल्याला असे कित्येक दिवस येत असतात, प्रसंग येत असतात जेव्हां अधिक धीर धरण्यास शिकण्याची संधि आपणांस मिळत असते.

समजा, एकाद्या मोठ्या कार्यकर्त्या व्यक्तीशीं तुमचें कांहीं काम आहे. तुम्ही त्याच्या घरीं जातां.

आधींच कित्येक लोक तेथें थांबलेले तुम्हांस दिसतात. त्यामुळें त्याची भेट होईपर्यंत दीर्घकाळ थांबणें तुम्हांस भाग पडतें. पण तुम्ही शांतपणें, कितीतरी तास तेथें थांबतां. याला म्हणतात धीर.

दुसऱ्या एकाद्या प्रसंगीं एकाद्या मनुष्यास भेटण्यास तुम्ही जातां व तो घरीं नसतो. दुसऱ्या दिवशीं तुम्ही पुनः जातां तेव्हांहि दार बंदच. पुनः तिसऱ्या वेळीं जेव्हां तुम्ही जातां तेव्हां तुम्हांला कळतें कीं तो आजारी आहे, म्हणून भेटूं शकणार नाहीं. कांहीं दिवस लोटल्यानंतर पुनः तुम्ही त्याच्याकडे जातां. याहि वेळीं, समजा, कांहीं नवीन कारण घडून त्याची गांठ पडूं शकली नाहीं तरीहि तुम्ही निराश होत नाहीं व त्याची गांठ पडेपर्यंत जाण्याचा उपक्रम चालूं ठेवतां. यालाच चिकाटी किंवा प्रयत्नसातत्य म्हणतात.

चिकाटी म्हणजे सक्रिय धीर. चिकाटी गतिशील असते, ती स्वस्थ बसूं देत नाहीं.

जिनोआ येथील प्रसिद्ध दर्यावर्दी कोलंबस हा, त्याकाळीं अज्ञात असलेल्या पश्चिम समुद्रांतून प्रवास करण्यासाठीं आपलें जहाज घेऊन निघाला.

दिवस निघून गेले, आठवडे निघून गेले, साथीदार कुरकुरतच होते. तरीहि ते सहन करून, नवीन भूमिप्रदेश शोधून काढण्याचा आपला दृढ निश्चय त्यानें ढळूं दिला नाहीं. विलंब लागला, अनेक अडचणी उपस्थित झाल्या, तरीहि अमेरिकेच्या किनाऱ्याजवळील बेटांपर्यंत येऊन पोहोंचेपर्यंत तो थांबला नाहीं. अशारीतीनें एक नवीन खंड शोधून काढण्याचें श्रेय त्यानें मिळविलें.

आपल्या साथीदारांकडून तो कशाची अपेक्षा करीत होता ? केवळ थोडा धीर त्यांनीं धरावा येवढीच त्याची इच्छा होती. त्यांनी त्याच्यावर भरंवसा ठेवावा व तो नेईल तिकडे मुकाट्यानें जावें एवढेंच त्याला पाहिजे होतें. ध्येयाप्रत पोहोंचण्याकरितां त्याच्या स्वतःच्याठिकाणीं कोणत्या गुणाची आवश्यकता होती ? अश्रांत उत्साह आणि दुर्दम्य इच्छाशक्ति. यालाच आपण चिकाटी किंवा प्रयत्नसातत्य म्हणतो.

प्राचीन काळच्या चिनी मातीच्या भांड्यांवर अत्यंत आकर्षक चमकदार रंगांनीं जें कांचेचें नक्षीकाम करीत असत त्याविषयींची लोपलेली विद्या शोधून काढावी अशी प्रसिद्ध कुंभार बर्नार्ड पॅलिसि (Palissy) याची इच्छा होती.

न थकतां, वर्षानुवर्षे तो शोध करीत होता. पण हें कांचेचें चमकदार लुकण शोधून काढण्याचे त्याचे प्रयत्न पुष्कळ वर्षे निष्फळच होत होते. जी कांहीं कमाई त्याच्या जवळ होती, तीहि त्यानें त्यांत खर्च करून टाकली. त्यानें तयार केलेल्या भट्टीसमोर तो रात्रंदिवस बसे ; नवीन नवीन पद्धतींनीं भांडीं बनविण्याचा व भाजण्याचा प्रयत्न करीत असे. त्याच्या कामामध्यें त्याला कोणीहि प्रोत्साहन व साह्य दिलें नाहीं; एवढेंच नव्हे तर, त्याचे शेजारी-पाजारी व मित्र त्याला वेडसर समजूं लागले. त्याची बायकोहि त्याच्या कामाबद्दल त्याला दोष देई.

कित्येक वेळीं, आवश्यक पैशाच्या अभावीं त्याला आपला शोध थांबवावा लागे पण थोडासा पैसा हातीं येतांच तो ताज्या दमानें पुनः कामाला लागे. शेवटीं एके दिवशीं भट्टीमध्यें घालायलाहि घरांत कांहीं नाहीं, म्हणून घरांतले राहिले साहिलेले सर्व लांकडी सामान त्यानें भट्टींत टाकून दिलें. घरांतील माणसांच्या आरडाओरडाची त्यानें यत्किंचितहि पर्वा केली नाहीं. सगळें जळून खाक झाल्यानंतर त्यानें भट्टी उघडून पाहिली. तों काय, इतकीं वर्षे तो शोधत असलेले रंग भांड्यावर चकमकत असलेले त्याला आढळून आले. शेवटीं याच रंगाच्या शोधामुळें त्याचें नांव सर्वत्र झळकलें.

यश येईपर्यंत शांतपणें थांबण्याऐवजीं त्याच्या मित्रांनीं आणि बायकोनें त्याचें काम अधिकच कष्टदायक करून ठेवलें; ते त्यास सतत त्रास देत राहिले. कोणत्या गोष्टीची त्यांच्यामध्यें कमतरता होती? केवळ धीराची. आणि कोणत्या एका गुणाचा त्याच्याठिकाणीं कधींच अभाव भासला नाहीं? ज्या गुणाची त्याला कधींच वाण पडली नाहीं व ज्यामुळें सर्व अडचणी व अपवाद तो सोसूं शकला असा कोणता गुण त्याच्या जवळ होता? चिकाटी. सर्व शक्तींहून बलवान् अशी सतत प्रयत्न करण्याची ही शक्ति. कारण ही शक्ति असल्यानंतर या जगांत कोणतीच गोष्ट कठीण वाटणार नाहीं.

सर्वांत मोठीं कामें पाहिलीं तर तीं सुद्धां लहान लहान पण अविश्रांत प्रयत्नांचाच परिणाम म्हणून झालेलीं असतात. एकाच ठिकाणीं सतत एकसारख पावसाचे थेंब पडत राहिल्यानें अवाढव्य खडकच्या खडक झिजून नाहींसे झालेलें आहेत. रेतीचा एकादा कण घेतला तर तो कांहीं इतका शक्तिमान् नसतो पण हेच कण जेव्हां एकत्र येतात तेव्हां त्यांच्या टेकड्या बनून त्यानें समुद्राच्या लाटा सुद्धां अडविल्या जातात. निसर्ग शास्त्राचा तुम्ही जेव्हां अभ्यास कराल तेव्हां तुम्हांला समजेल, कीं लहान लहान क्षुद्र जीव एकत्र येऊन त्यांचे समुद्राखालीं पर्वतच्यापर्वत तयार होतात. व त्यांची शिखरें सुंदर सुंदर बेटांच्या रूपानें समुद्राच्या पृष्ठभागावर दिसूं लागतात. खरोखर धन्य आहे त्यांच्या या अविरत प्रयत्नांची!

तुम्ही सुद्धां एकसारखे सतत प्रयत्न करून अशाच महान् गोष्टी करून दाखवूं शकाल असें तुम्हांला नाहीं कां वाटत?

*

प्रसिद्ध दर्शनकार शंकराचार्य हे सुमारें १२०० वर्षांपूर्वी होऊन गेले. त्यांचें नांव मलबार प्रदेशाला भूषणावह आहे. लहानपणापासूनच त्यांनीं मनाचा असा निश्चय केला होता, कीं आपण संन्यासी व्हावयाचें. हें ध्येय उदात्त आहे असें पटूनहि त्यांच्या आईनें त्यांना संन्यास घेण्यास बरेंच दिवस संमति दिली नाहीं.

एक दिवस ते आणि त्यांची आई नदीवर स्नान करण्याकरतां गेले. शंकराचार्यांनीं नदींत बुडी मारल्यावर आपला पाय सुसरीनें पकडला आहे असें त्यांच्या ध्यानांत आलें. मृत्यू तर येऊन ठेपला पण अशा प्राणांतिक प्रसंगांतहि या वीर बालकाच्या मनांत आपल्या महान् ध्येयाखेरीज दुसरा कोणताच विचार नव्हता. त्यानें ओरडून आईला म्हटलें, "मी तर आतां मरणार, एक सुसर माझा पाय ओढत आहे. निदान संन्यासी म्हणून तरी मला मरूं दे."

आई निराश होऊन, स्फुंदत स्फुंदत म्हणाली, "हं, हं...... बाळा!"

शंकराचार्यांचें भाग्य जोरदार म्हणून त्यांना त्यावेळीं अशी कांहीं शक्ति आली कीं, त्यांनीं सुसरीच्या मिठींतून आपला पाय सोडवून काढला आणि ते कांठावर येऊन पाहोंचले.

त्यानंतर वयाबरोबरच ज्ञानानेंहि ते मोठे होत गेले. व शेवटीं गुरुपदीं पोहोंचले. आपल्या अद्‌भुत जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत ते ज्ञानोपदेशाचें महान् कार्य निरंतर करीत राहिले.

*

भारतवासियांना महाभारत हें सुंदर महाकाव्य सुपरिचित आहेच. कित्येक शतकांपूर्वी तें संस्कृतमध्यें रचलें गेलें. परंतु अगदीं परवां परवां पर्यंत संस्कृत येत असल्याशिवाय कोणीहि युरोपियन मनुष्य तें वाचूं शकत नसे; युरोपियन लोकांना संस्कृत शिकणें तर कितीतरी अवघड ! त्यामुळें या महाकाव्याचें एकाद्या युरोपियन भाषेमध्यें भाषांतर होणें आवश्यक होतें.

या कार्यास स्वतःस वाहून घ्यावें असें बाबू प्रतापचंद्र राय यांना वाटलें. या संस्कृत ग्रंथाचा अनुवाद इंग्रजीमध्यें करूं शकतील असे त्यांच्याच प्रांतांतील एक विद्वान मित्र त्यांना आढळले. त्यांचें नांव किशोरी मोहन गांगुली.

सतत बारा वर्षें प्रतापचंद्र राय हेंच काम करीत होते. आपली सर्व संपत्ति त्यांनीं याच ग्रंथाच्या प्रकाशनासाठीं खर्च केली. त्यांच्याजवळचा सर्व पैसा संपला, कीं ते सबंध देशभर दौरा काढत असत. या कार्यास ज्यांना ज्यांना मदत करावीशी वाटे त्या सर्व लोकांजवळ ते मदत मागत. मदत करणारांमध्यें राजे लोकहि होते आणि शेतकरीहि; विद्वान जसे होते तसेंच अशिक्षित अडाणीहि होते. युरोप आणि अमेरिका येथील मित्रहि होते. अशा दीर्घ परिश्रमानें त्यांनीं या ग्रंथाचे एकेक भाग क्रमशः छापून प्रसिद्ध केले.

असेच एकदां एका दौऱ्यावर गेले असतांना त्यांना हिंवतापानें पछाडलें; त्यांतच त्यांना मृत्यू आला. आजारी असतांनाहि त्यांचे सर्व विचार हेंच काम पूर्ण करण्यावर केंद्रित झाले होते. बोलतांना अतिशय कष्ट होत, तरी त्यावेळींहि ते आपल्या पत्नीला सांगत असत, "पुस्तकाचें काम पूर्ण झालेंच पाहिजे. पुस्तक प्रकाशनासाठीं पैशाची आवश्यकता असेल तर माझ्या अन्त्य विधींमध्येंहि पैसा खर्च करूं नको. शक्य तितकी साधेपणानें राहून महाभारतासाठीं पैसा वांचव."

अशारीतीनें भारत आणि भारताचें महाकाव्य यांविषयीं त्यांचें हृदय नितांत प्रेमानें ओथंबलें असतांनाच त्यांचा अंत झाला.

त्यांची विधवा पत्नी सुंदरीबाला हिनें प्रतापचंद्रांच्या इच्छेचें श्रद्धापूर्वक पालन केलें. एका वर्षाच्या अवधींतच अनुवादकानें अनुवाद कार्य पुरें केलें, आणि महाभारताचे अकरा भाग युरोपीय समाजाला प्राप्त झाले. या अद्‌भुत महाकाव्याचे अठरा पर्व युरोपियन लोकांना वाचावयास मिळाले. हा ग्रंथ वाचून प्राचीन भारताचे प्रगाढ विचारवंत व कवी यांच्या महान् प्रतिभेविषयीं व ज्ञानभांडाराविषयीं त्यांना आदर निर्माण झाला.

प्रतापचंद्र राय किंवा त्यांच्या सारख्याच अन्य व्यक्तींप्रमाणें जे अखंड परिश्रम करीत रहातात त्या सर्वांच्या प्रयत्नाला हीं अशीं महान् फळें येतात.

लाडक्या मुलांनो ! सत्कार्याचा ज्यांना कधींच कंटाळा येत नाहीं आणि काम पूर्ण झाल्याशिवाय जे कधींच तें अर्धवट सोडत नाहींत, अशा महान् स्त्रीपुरुषांच्या मालिकेमध्यें सामील व्हावयास तुम्हांसहि आवडणार नाहीं कां ?

या अफाट जगामध्यें, करण्यास योग्य अशा सत्कर्मांचा कधींच अभाव नसतो किंवा तीं कार्यें हातीं घेणाऱ्या चांगल्या व्यक्तींचीहि वाण नसते. पण सामान्यतः कशाची कमतरता पडत असेल तर ती या **'प्रयत्नसातत्याची'**. या गुणाच्या बळावरच केवळ, अशीं काय सिद्धीस जाऊं शकतात.

—श्रीमाताजी

# फुलांचे आध्यात्मिक अर्थ

(पुढें चालू)

१) धोत्रा–(पिवळा, दुहेरी)–मानसिक तपस्या २) धोत्रा–(पांढरा) बरेच मोठें फूल–संपूर्ण तपस्या ३) धोत्रा (जांभळा–दुहेरी)–भावनांची तपस्या ४) बुचाचें फूल–(पांढरें) –परिवर्तन, संपूर्ण रूपांतर ५) अशोक–अ-शोक, शोक विरहितता ६) शिरीष–चातुर्य, शहाणपणा, ज्ञान ७) गुलमोहोर–(लाल फूल-पांकळ्यांत पांढऱ्या रेषा)–साक्षात्कार ८) सदाफुली–(पांढरी) सर्वांगीण प्रगति ९) सदाफुली–(पांढरी, मध्य जांभळा)–प्राणशक्तीची सर्वांगीण प्रगति १०) सदाफुली–(गुलाबी)–प्राणशक्तीची, भावभावनांची प्रगति. ११) झेंडू –(पिवळा, मध्यें-तपकिरी तुरा)–लवचिकता, नमनीयता, संस्कारक्षमता. १२) झेंडू–(पिवळा –दुहेरी)–मानसिक नमनीयता. १३) झेंडू–(तपकिरी)–शारीरिक लवचिकता. १४) झेंडू–(शेंदरी, दुहेरी)–अतिमानस पातळीवरील नमनीयता. १५) दुपारीचीं फुलें–(अबोलीरंग)– –शाश्वत तारुण्य. १६) घोळाची फुलें–श्रीअरविंदांची कृपामय करुणा. १७) तंबाखूचीं फुलें–(लाल)–व्यावहारिकता. १८) तंबाखू–(पांढरी)–निश्चितता. १९) डाळिंबाचें फूल–(लाल. दुहेरी)–भागवत, दिव्य प्रेम. २०) रात्रराणी–वायुतत्त्व. २१) काशीफळ अथवा भोपळ्याचें फूल–विपुलता. २२) बोगनवेल–संरक्षण. २३) बोगनवेल–(फिकट गुलाबी) –भावनांचें संरक्षण. २४) बोगनवेल (पांढरी)–सर्वांगीण संरक्षण. २५) बोगनवेल–(लाल भडक)–शारीरिक संरक्षण. २६) बोगनवेल–(गुलाबी शेंदरी)–आंतरात्मिक संरक्षण. २७) बोगनवेल–(जांभळी)–हार्दिक संरक्षण. २८) बोगनवेल–(शेंदरी)–तिहेरी संरक्षण–(शारीरिक, प्राणिक, मानसिक). २९) तेरडा–(लाल, दुहेरी)–भावनाची उदारता, दिलदारपणा. ३०) तेरडा–(गुलाबी, दुहेरी)–आंतरात्म्याची उदारता. ३१) तेरडा–(लाल, मध्य पांढरा)–मानसिक व वैज्ञानिक उदारता.

---

## संजीवनचे मागील अंक


जानेवारी १९५५ ते जुलै १९५५

ऑगस्ट १९५६ ते जुलै १९५७

संजीवनचे क्रमशः अंक शिल्लक आहेत. शिवाय कांहीं सुटेहि अंक मिळूं शकतील. वरील सर्व अंकांची किंमत **पोस्टेजसह रु. ५**

वाचकांनीं संजीवन कार्यालयाचे पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

—संपादक

# स्फुट विचार

## योग-जाल

जें परमोच्च आहे, त्याच्याशीं तुझ्या सर्व स्थितीगतींनीं सर्वशः एकरूप होणें म्हणजे योग.

जें सर्व आहे, त्याच्याशीं सर्वशः एकरूप होणें म्हणजे योग. तुझ्या बुद्धीनें, तुझ्या अंतःकरणानें आणि तुझ्या सर्वांगांनीं तुझ्या आत्म्याशीं आणि मानवतेंतील देवाशीं एकरूप होणें म्हणजे योग.

समग्र प्रकृतीशीं आणि अखिल प्राणिमात्राशीं एकरूप होणें म्हणजे योग.

ह्या सर्वांचा अर्थ हा कीं, विश्वातीत परमेश्वराशीं, विश्वरूप परमेश्वराशीं व त्यानें स्वतः-च्या ठिकाणीं निर्माण केलेल्या सर्वांशीं, एकरूप व्हावयाचें. कारण हें सारें तद्भव आहे आणि तदंतर्गत आहे; तोच हें सर्व आहे आणि तोच या सर्वांत आहे; तुझा परमोच्च स्वयं तोच आहे, तुझ्या चैतन्य स्वरूपांत त्याच्याशीं तूं एकरूपच आहेस; तुझ्या आत्मस्वरूपांत तूं त्याचा अंश आहेस, आणि तुझ्या प्रकृतीद्वारां तूं त्याच्याशीं क्रीडा करत आहेस. त्याच्या संभूतींत जग ही एक रंगभूमि आहे आणि त्यांत तो तुझा गुप्त स्वामी, प्रियकर, सखा आहे; तो तुझा प्रभू आहे आणि तुझ्या सर्वस्वाचा भर्ता आहे. म्हणूनच त्याच्याशीं एकरूप होणें हा तुझ्या जीवन-साफल्याचा एकमेव मार्ग आहे.

*

## योगाचा उत्क्रांति-हेतु

मानवप्राणी म्हणजे, जड पार्थिव तत्त्वावर चैतन्याचा धर्म आणि मानवी स्वभावावर देवत्वाचा स्वभाव संस्कारित करण्याचा अदृष्य हेतु बाळगणारा, या भौतिक जगांत गतिरुद्ध जडतेच्या वातावरणामध्यें मानवतेशीं विहार करणारा पृथ्वीतलावरील देवच होय. उत्क्रांति म्हणजे दुसरें कांहीं नसून पार्थिव, प्राकृत जाणीवेच्या जडतेंतून विकसित होणारा चैतन्या-विष्कार आणि या दृष्य प्राणिजीवनांतून घडणारा देवाचा संतत आत्माविष्कारच होय.

ज्या तपःसामर्थ्याच्या द्वारें देवानें हें जग निर्माण केलें आहे, त्याचें तो भरण पोषण करीत आहे आणि त्याचा संहारहि करील, त्या महान् तपःसामर्थ्याचा या दिव्य आत्माभिव्यक्तीच्या प्रक्रियेकरितां प्रत्यक्ष उपयोग करणें म्हणजे योग. पाशवी मानवतेच्या मर्यादित कर्मांच्या जागीं, नेहमीं अनंत अशा दिव्य सामर्थ्याच्या कर्मांची प्रत्यक्ष योजना योगसाधन करतें. दिव्य-त्वाप्रत आरोहण करण्यासाठीं दिव्य साधनांचा तें अवलंब करतें. सर्व योग म्हणजे तपस्या आणि योगसिद्धि म्हणजे, दिव्य पुरुषाशीं एकत्व अथवा सामिप्य यांच्या द्वारां होणारी देवत्व-प्राप्ति. ही देवत्वप्राप्ति दिव्य पुरुषाच्या तत्त्व स्वरूपांत अथवा व्यक्त स्वरूपांत किंवा उभय स्वरूपांत अथवा एकाच वेळीं एकत्व आणि सामिप्य यांच्या स्वरूपांत होते.

सायुज्य अथवा एकत्व हा अद्वैतसिद्धांत, सामिप्य हा द्वैतसिद्धांत, आणि विशिष्ट सामर-स्यात्मक सामिप्य हा विशिष्टाद्वैत सिद्धांत आहे. पण मूलभूत तत्त्वानुभूतिद्वारां देवाशीं होणारी सायुज्यता आणि त्याच्या आविष्कारांमध्यें अनुभव घेत असतां त्याच्याशीं होणारें पृथ-गात्मक सामिप्य यांच्यामुळेंच संपूर्ण सिद्धि प्राप्त होते.

—श्रीअरविंद

# भारताचें भवितव्य

आपल्या स्वत्वास जागून व आपल्या स्वभावधर्मास अनुसरूनच भारतास आपला उत्तम विकास करून घेतां येईल व मानवतेची सेवा करतां येईल. याचा अर्थ असा मात्र नव्हे कीं, कालाच्या ओघांत जें कांहीं नवीन येईल किंवा जें कांहीं विकसित करण्याचें अथवा परिणामकारक रीतींनीं व्यक्त करण्याचें श्रेय पाश्चिमात्यांना मिळालें आहे त्या प्रत्येकाचा त्याग करावायचा. कारण मनाच्या संकुचितपणामुळें व विचार न केल्यामुळे कांहींचा असा ग्रह झालेला दिसतो. पण अशी मनोवृत्ति धारण करणें विचाराच्या दृष्टीनें मूर्खपणाचें, व भौतिकदृष्टचा अशक्य आहे; आणि विशेषतः ही वृत्ति आध्यात्मिकतेचा पूर्ण अभाव दर्शविते; खरी आध्यात्मिकता अभिनव ज्ञान किंवा मानवी आत्मविकासाची अधिक नवीन साधनसामग्री यांना कधींच डावलणार नाहीं. आध्यात्मिकता म्हणजे आपल्या अस्तित्वाचा मध्यबिंदु कायम ठेवावयाचा, आपली मूळ घडण, आपला जन्मजात स्वभाव कायम राखून जें कांहीं नवनवीन येतें तें आपल्या मूळ स्वभावांत मिळवून टाकावयाचें आणि जें प्रत्येक कर्म आपल्या हांतून घडतें व आपण जाणीवपूर्वक करतो, तें आपल्या नव अस्तित्वांतून विकसित करावयाचें. भारतीय मनाचा प्रधान विषयच धर्म आहे; कोणी म्हणतात, –"अतिशयित धार्मिकतेमुळे भारताचा अधःपात झाला आहे. आपण संपूर्ण जीवन धर्ममय करून टाकलें किंवा धर्म हेंच संपूर्णतया जीवन मानलें, यामुळेंच आपण जीवनांत अपेशी ठरलो व अधःपतित झालो." 'आमची अवनति, पराभव झाला तरी त्यांत आम्हाला हरकत वाटत नाहीं; आम्ही ज्या धुळींत लोळत आहों ती तर पवित्र आहे' असें एका कवीनें दुसऱ्या एका संदर्भात म्हटलें आहे. वरील आक्षेपाला उत्तर देण्याकरितां त्या कवीची भाषा वापरण्याच्या थराला मी जाणार नाहीं. अधःपाताविषयीं गंभीरपणें खासच विचार करावयास हवा. धुळीस मिळणें, तेथें लोळणें ही, माणसास अथवा राष्ट्रास कांहीं मोठी चांगली स्थिति नाहीं. पण या दुर्गतीचें दाखविलेलें कारण मात्र खरें नाहीं. जर बहुसंख्य भारतीयांनीं धर्म हेंच, खऱ्या अर्थानें आपलें समग्र जीवन बनवून टाकलें असतें; तर आजच्या अवनतीस आपण खास पोंचलों नसतो. आपलें सार्वजनिक जीवन अधार्मिकतेनें, अहंमन्यतेनें, स्वार्थपरायणतेनें आणि जडवादीवृत्तीनें भरलें गेलें, व त्यामुळें आपण स्थान-भ्रष्ट झालों. एका बाजूनें अतिरिक्त धार्मिकपणा, म्हणजेच धर्मविषयक संस्कार, नियम, न बदलणारी दैनंदिन रहाणी, पूजादि कर्मांतील यांत्रिकपणा असा दिखाऊ धार्मिकपणा आपण अंगीकारला, तर दुसऱ्या बाजूनें, तपस्व्यास इष्ट अशी प्रपंचविरक्ति स्वीकारली; या प्रपंच पराङमुखतेनें समाजास उत्तमोत्तम नररत्नांचा लाभ मिळणें अशक्य झालें; पुरातनऋषींच्या-प्रमाणें सामाजिक जीवनास आध्यात्मिकतेनें संजीवन देण्याचें, तें जीवन ज्ञानदीप्तीनें उजळून टाकण्याचें कार्य बंद पडलें. पण खरें कारण आणखीहि निराळेंच होतें. आध्यात्मिकता सार्वत्रिक करावी, व्यापक करावी ही पहिली प्रेरणा क्षीण होत गेली, बुद्धिनिष्ठ कार्य व विचारस्वातंत्र्य लोप पावत गेलें, ध्येयांतील उदात्तता ओसरत गेली, जीवनामागील जोरकस आवेश संपुष्टांत आला––यांत सर्व अवनतीचें मूळ कारण होतें.

भारतांत धर्माच्या बाह्योपचारांचा एका अर्थानें अतिरेक झाला होता, असें एकवेळ म्हणतां येईल. सांप्रदायिक मतें, विधि, वरपांगी धर्मशीलता हेच विशेषेंकरून ह्या बाह्योपचारांत गणलें आहे. धर्म या शब्दाचा इंग्रजी अर्थ हा आहे. आध्यात्मिक प्रेरणेप्रमाणें संपूर्ण आचरण करणें, असा धर्म या शब्दाचा अर्थ घेतला व परमात्मा, दिव्यता, सर्वव्यापी एकत्व यांची अनुभूति घ्यावयाची आणि त्या स्थितींत, त्या भूमिकेंत जीवन व्यतीत करावयाचें; जीवनाच्या अंगोपांगाचें शक्य त्या अत्युच्च दिव्य पातळीपर्यंत उत्थापन करावयाचें, असा आध्यात्मिकतेचा अर्थ केला तर असें दिसून येईल कीं, धर्माचा अतिरेक नव्हेच तर त्याचा जवळ जवळ अभावच भारतीय जीवनांत दिसून येत होता.––आणि जेथें थोडा धर्माचा अंश दिसला तेथेंहि तो एकाङ्गी होता, व अपुराहि होता. तेव्हां यावर खरा उपाय म्हणजे पुरातन भारतीय आदर्शाचा अधिक धिक्कार न करतां, त्यास आपल्या जीवनांत पूर्वीची व्यापकता आणून देणें, त्यास आणखी अधिक व्यापक क्षेत्र देणें, धर्माचा आतां जो उच्च आध्यात्मिक अर्थ सांगितला, त्या अर्थानें समग्र राष्ट्रीय जीवन धर्ममय करणें, हा होय. पाश्चिमात्य तत्त्वज्ञ, कवि, कलावंत यांचीं पावलेंहि याच दिशेनें पडत आहेत. तीं जरी अजून कांहींशीं चांचपडत असली तरी दिशा हळुंहळुं उजळूं लागल्या आहेत आणि त्यांना राजकीय व सामाजिक आदर्शाविषयीं अस्पष्टपणें कां होईना, सत्यदर्शन घडूं लागलें आहे. त्या श्रेष्ठ आदर्शाच्या ज्ञानाची व तो जाणीवपूर्वक आचरणांत आणण्याची किल्ली भारताच्या हातांत आहे; त्या आदर्शाचें आचरण करतांना जो भाग अंधाराचा वाटत होता तो आतां नवीन ज्ञानानें उजळून निघेल. जुन्या पद्धतींत जें चुकलें, ज्या विकृती निर्माण झाल्या त्या सर्व आतां दुरुस्त करतां येतील. आध्यात्मिक आदर्शांची बाह्य जीवनांत वाढ व्हावी म्हणून संरक्षणार्थ प्रथम जीं कुंपणें त्यानें घातलीं होतीं व जीं पुढच्या काळांत त्या थोर आदर्शाच्या विस्तारास व प्रत्यक्ष आचारास तटासारखी बंधनकारक ठरलीं आहेत, तीं आतां काढून फेंकून देऊन, आपल्या आत्मविहगास वावरण्यास अधिक क्षेत्र व पंख पसरण्यास, आकाशांत उड्डाण करण्यास अधिक मोकळें वातावरण प्राप्त करून देणें आतां शक्य होईल. ज्या प्रश्नाच्या भोंवऱ्यांतून यशस्वी रीतीनें बाहेर पडण्यासाठीं अखिल मानवजाति कष्टानें प्रयत्न करीत आहे; तसें करतांना त्यांतच पुनः पुनः अडकून पडत आहे अशा प्रश्नास भारत मनांत आणील तर, एक अभिनव दिशा, एक निर्णायक स्वरूपाची दिशा लावूं शकेल; कारण भारताच्या प्राचीन भाण्डारांत, या प्रश्नाची उकल करतां येईल असें ज्ञान आहे. पुनरुज्जीवनाच्या या संधीचा उत्तमांत उत्तम उपयोग करून घेण्याचें महत्त्वाचें कार्य भारताचे हांतून होणार कीं नाहीं, हें भारताच्या भवितव्यावर अवलंबून आहे.

––श्रीअरविंद

(Renaissance in India)

SABCL Volume 14 : Page 432

# कांहीं स्पष्टीकरणें

**प्रश्न** :—जप, धर्मग्रंथांचें वाचन, पूजा इत्यादि धार्मिक आचार म्हणजे दिव्य जीवनाची अभीप्सा असल्याचीं लक्षणें नव्हेत काय ? त्यांच्या साह्यानें सर्वोच्च सत्य गांठतां येणार नाहीं काय ?

**उत्तर** :—कोणत्या वृत्तीनें हे आचार पाळले जातात त्यावर तें अवलंबून आहे. हे धार्मिक आचार-विधी पालन करूनहि एखाद्याच्या ठिकाणीं अध्यात्माचा अभाव दिसून येईल किंवा तो असुरवृत्तीचाहि राहूं शकेल.

**प्रश्न** :—यात्रा करणें, अनेक देव-देवतांची पूजा करणें यांना आध्यात्मिकदृष्ट्या कांहीं महत्त्व आहे काय ? दिव्य सत्याचा साक्षात्कार करून घेण्यास त्याची कांहीं मदत होते काय ?

**उत्तर** :—दिव्य सत्याशीं अशा गोष्टींचा कांहीं एक संबंध नाहीं. सर्वसामान्य लोकांकरितां तो एक धार्मिक स्वरूपाचा अभ्यास, आचार आहे इतकेंच.

**प्रश्न** :—वैष्णव सांप्रदायांत प्रचलित असलेल्या संकीर्तनाचा आध्यात्मिकदृष्ट्या काय उपयोग असतो ?

**उत्तर** :—अशा संकीर्तनाच्या अंगीं भक्ति जागृत करण्याची, विशेषतः व्यक्तीच्या वासनाभावनात्मक भागांत भक्ति जागी करण्याची शक्ति असते.

**प्रश्न** :—'कुटुंबांतील एका व्यक्तीस जर कां आध्यात्मिक साक्षात्कार झाला तर अशा व्यक्तीच्या प्रभावसंपन्नतेचें फळ म्हणून इतर कुटुंबियांसहि मोक्ष मिळतो', असें मीं धार्मिक ग्रंथांत वाचलें आहे. हें कितपत खरें आहे ?

**उत्तर** :—हें खरें नाहीं. प्रत्येकाला स्वतःची अशी स्वतंत्र नियति असते. साक्षात्कार करून घेतलेली व्यक्ति एकाद्या जन्मांत, एकाद्या विशिष्ट कुटुबांत जन्मलेली असणें, हा केवळ एक योगायोग असतो.

**प्रश्न** :—एकाद्यानें दुसऱ्या एकाद्या व्यक्तीसमोर कोणत्याहि पद्धतीनें थोडा वेळ जरी देवाचें स्मरण केलें, देवाचें नांव उच्चारलें तर केव्हांतरी त्याचा परिणाम दिसून येईल आणि त्या व्यक्तीमध्यें आध्यात्मिक दृष्ट्या बदल होईल, असें श्रीरामकृष्ण म्हणत असत; असें घडून येणें शक्य असतें काय ?

**उत्तर** :—उंदराला, 'सिंह' 'सिंह' म्हणून त्याला सिंह बनविणें हें जितकें अशक्य तितकेंच हेंहि अशक्य आहे.

**प्रश्न** :—कांहीं लोक संपूर्णतया ऐहिक जीवनांत मग्न झालेले असतात; संकटकाळीं किंवा आपत्ति ओढवली म्हणजेच फक्त ते देवाचें स्मरण करतात. अशा व्यक्ती देवाकडे संपूर्णपणें वळणें शक्य आहे काय ?

**उत्तर** :—भविष्यकाळीं अशा प्रकारची शक्यता कोणालाहि असते. नास्तिक अथवा देवासंबंधीं जे कधीं विचारहि करीत नाहींत अशांच्याहि बाबतींत तशी शक्यता असते.

**प्रश्न** :—नास्तिक अथवा देवासंबंधींचा विचार देखील ज्याला कधी शिवला नाहीं अशा व्यक्तीलासुद्धां जर देवाकडे संपूर्ण वळण्याची भावी शक्यता असली तर मग आध्यात्मिक जीवन कशाकरितां स्वीकारावयाचें? व त्या जीवनांतील अडचणींना तोंड काय म्हणून द्यावयाचें?

**उत्तर** :—भावी शक्यता कदाचित् दहा हजार वर्षांनीं प्रत्यक्षांत फळाला येईल आणि त्यावेळीं सुद्धां योगाचें आचरण केलें तरच.

**प्रश्न** :—सामान्य लोक आपत्तीचें वेळीं, आपत्ति दूर होण्यासाठीं भगवत्कृपेची याचना करतात पण नंतर ईश्वरास विसरून जातात. अशा लोकांच्या जीवनांत भगवत्कृपेचें कार्य केवळ याच पद्धतीनें होत असतें काय?

**उत्तर** :—फक्त सामान्य लोकांच्या जीवनांत असें घडून येतें. पण जे ईश्वर प्राप्तिसाठीं प्रयत्न करीत असतात त्यांच्या बाबतींत असें नसतें. जे साधक असतात त्यांच्यावर भगवंताची विशेष कृपा असते. इतरांचे बाबतींत त्यांचें जें 'कर्म' असेल त्याद्वारां विश्वगत भागवत संकल्प कार्य करीत असतो.

**प्रश्न** :—भगवत्संकल्प आणि भगवत्कृपा यांमध्यें कांहीं अंतर आहे काय? तीं दोन्हीं एकच नव्हेत काय?

**उत्तर** :—सर्वच गोष्टींत भगवत्संकल्प असतो. भगवत्संकल्पाला कांहींहि करणें शक्य असतें. भगवत्कृपा साहाय्यास येते, वांचविते.

**प्रश्न** :—ज्या साधकाला या जन्मीं भगवंताकडे आपल्या सर्व वृत्ती वळवितां आल्या नाहींत तो पुढील जन्मीं योग-जीवनाचा स्वीकार करतो व साधना पुढें चालवितो असें म्हणतां येईल काय?

**उत्तर** :—होय. पुढील जन्मीं तो साधना चालू करील हें पुष्कळ अंशीं खरें आहे; मात्र अशी साधना पुनः पुढें चालू करण्यापूर्वी, मार्गांत आड येणाऱ्या स्वतःमधील विरोधी वृत्ती त्यास नाहींशा कराव्या लागतात.

**प्रश्न** :—ऐहिक ध्येय समोर ठेवून व्यवहार करीत असतांना या जन्मीं जे परमेश्वराकडे अंतशःच वळलेले असतात ते पुढील जन्मीं संपूर्णपणें आध्यात्मिक जीवन अंगिकारतील असें म्हणतां येईल काय?

**उत्तर** :—त्यासंबंधीं कोणताच ठराविक कांटेकोर नियम सांगतां येणार नाहीं. त्यांचा गतजन्म, चालू जीवन व भावी आकांक्षा यानुसार त्यांचा विकास होत राहील.

**प्रश्न** :—उभ्या आयुष्यांत ज्यांनीं देवासंबंधीं कधीं विचार केला नाहीं, अशा लोकांनीं जर मृत्युशय्येवर असतांना प्राणोत्क्रमणाच्या शेवटच्या उच्छ्वासाचे वेळीं देवाचें नांव उच्चारलें

किंवा देवाचें स्मरण केलें तर पुढील जन्मीं त्यांना मुक्ति मिळेल असा कांहींचा विश्वास असतो. त्यांत कांहीं सत्य आहे काय?

**उत्तर** :—मुळींच नाहीं. ती एक भ्रामक समजूत आहे. मुक्ति इतकी सुलभ असती तर कोणीहि जन्मभर कांहींहि केलें असतें आणि जीवनाच्या शेवटच्या क्षणीं देवाचें स्मरण करण्याची केवळ युक्ति योजून ती सर्वोच्च स्थिति मिळविली असती. ही एक वेडगळ कल्पना आहे.

**प्रश्न** :—पुराणांतरीं अनेक उच्चतर 'लोक' व 'जगत्' यांचे उल्लेख येतात. मृत्यूनंतर खरोखरीच माणसें या लोकांप्रत जाऊन तेथें राहतात काय?

**उत्तर** :—त्यांतील कांहीं लोकांमधून ते जातात ; सर्वांमधून नाहीं.

**प्रश्न** :—जो मनुष्य सदाचरणी असतो किंवा धार्मिक जीवन जगतो त्याला मृत्यूनंतर स्वर्ग प्राप्त होतो, असा जो समज आहे त्यांत कितपत तथ्य आहे?

**उत्तर** :—मृत्यूनंतर तो कांहींकाळ सुखकर स्थितींत राहतो, इतकेंच.

**प्रश्न** :—परलोकांत हजारों नरक आहेत आणि जे कोणी या जन्मांत दुष्ट कृत्यें करतात त्यांना मरणोत्तर नरकलोकांत जाऊन रहावें लागतें असें जें पुराणांत सांगतात तें खरें कां?

**उत्तर** :—तो एक लोकभ्रम आहे. मरणानंतर कांहीं वासनामय व मानसिक जगतांमधून अथवा कांहीं मानसिक अवस्थांमधून लोक जातात. या मानसिक अवस्था त्यांच्या प्रकृतीचें व जीवनांतील कृत कर्मांचें फल असतें. नंतर ते यांतून आत्मलोकांत-आंतरात्म्याच्या जगतांत (psychic world) जातात व तेथून कालान्तरानें पृथ्वीवर परत फिरतात.

**प्रश्न** :—बऱ्याच काळापूर्वी मृत झालेल्या माझ्या नातेवाईकांशीं कधीं कधीं स्वप्नांत माझी गांठ पडते व मी त्यांच्याशीं बोलतो; असें कां घडतें?

**उत्तर** :—त्यांच्या भौतिक जीवनांतील संस्कार व कल्पना, वासनाभावनांच्या जगतांत शिल्लक राहिलेल्या असतात; या जगतांतच तुमची त्यांची गांठ पडते.

**प्रश्न** :—मृत नातेवाईक साधकाच्या मार्गांत अडथळे आणून त्याच्या साधनेंत व्यत्यय आणूं शकतात काय?

**उत्तर** :—साधकानें तसें करूं दिलें तरच केवळ तें शक्य आहे.

**प्रश्न** :—योगांत, फलज्योतिष शास्त्रास कांहींच स्थान नाहीं काय?

**उत्तर** :—ज्योतिषशास्त्र हें एक गूढशास्त्र आहे. योगशास्त्राचें तें अंग नाहीं. कोणतीहि गोष्ट योग्यभूमिकेनें केल्यास ती योगाचें अंग बनूं शकते. तसेंच ज्योतिषशास्त्रहि योगाचें अंग होऊं शकेल.

**प्रश्न** :—आध्यात्मिक जीवनाला ज्योतिषशास्त्राची कांहीं मदत होऊं शकते काय?

**उत्तर** :—नाहीं.

**प्रश्न** :—ज्योतिषशास्त्राकडे बघण्याची आपली काय दृष्टि असावी ?

**उत्तर** :—दुसऱ्या कोणत्याहि कलेकडे अथवा शास्त्राकडे पाहतांना असते तशी.

**प्रश्न** :—योगांत गूढशक्तीस कोणतें स्थान आहे ?

**उत्तर** :—अति-भौतिक (Supra-physical) पातळीवरील सूक्ष्म शक्ती जाणून घेणें व त्यांचा उपयोग करणें हा योगाचा एक भागच आहे.

**प्रश्न** :—गूढ प्रयत्न आणि गूढ शक्ति यांचा अर्थ काय ?

**उत्तर** :—अर्थ संदर्भावर अवलंबून राहील. सामान्यपणें 'गूढ शक्ति' म्हणजे निसर्गाच्या गूढ शक्तींचा उपयोग करण्याची शक्ति आणि 'गूढ प्रयत्न' म्हणजे गूढ शक्तींच्या साह्यानें केलेला प्रत्यक्ष उपयोग. पण 'गूढ' या शब्दाला दुसऱ्या एकाद्या संदर्भात दुसरा कांहीं अर्थ असणें संभवनीय आहे.

**प्रश्न** :—प्रत्येक योग्याला गूढ शक्तींच्या साहाय्यानें केलेल्या गूढ प्रयत्नांतून जावें लागतें काय ?

**उत्तर** :—नाहीं. प्रत्येकाचें अंगीं तेवढें सामर्थ्यहि नसतें आणि ज्यांच्या अंगीं तसें सामर्थ्य नसतें त्यांनीं तें प्राप्त होईपर्यंत थांबलें पाहिजे.

**प्रश्न** :—'दिव्यशक्ति' आणि 'योगशक्ति' या दोन्हीं एकच काय ? (तपस्येनें प्राप्त झालेल्या शक्ती या अर्थानें मी योगशक्ति म्हणतो ; )

**उत्तर** :—अशा तऱ्हेची जी योगशक्ति ती म्हणजे दिव्य शक्ति नव्हे. असुर व राक्षस यांच्या अंगींहि शक्ती असतातच. भागवत चेतना आणि तिचीं कार्यें यांच्याशीं संयोग अथवा एकत्व पावल्यानें जी शक्ति प्राप्त होते ती खरी योगशक्ति.

**प्रश्न** :—साधकाच्या जीवनांत चमत्कार घडतात काय ?

**उत्तर** :—'चमत्कार' म्हणजें तुम्हांस काय म्हणावयाचें आहे ? मनाला आकलन होऊं शकणार नाहीं अशा अज्ञात पद्धतीनें जेव्हां कांहींतरी विस्मयजनक करून दाखविलें जातें त्याला लोक चमत्कार म्हणतात.

**प्रश्न** :—'चमत्कार' करून दाखविण्याची शक्ति म्हणजे योगसिद्धि काय ? अशी शक्ति जर साधकाला प्राप्त झाली असेल तर तिचा उपयोग करण्यांत कांहीं चूक असते काय ?

**उत्तर** :—'चमत्कार' म्हणून कांहीं नाहीं हें मीं वर स्पष्ट केलेंच आहे. जर उच्चतर चेतनेमुळें, उच्चतर जाणीवेमुळें एकादी उच्चतर शक्ति साधकाचे ठिकाणीं उत्पन्न झाली तर ती त्या अभिनव उच्चतर चेतनेचा भाग म्हणून उपयोगांत आणावी लागते. मात्र ती शक्ति योग्य पद्धतीनें म्हणजे निरहंकारपणें, निःस्वार्थीपणानें, आत्मसंभावना किंवा आत्मप्रौढी यांपासून अलिप्त राहून उपयोगांत आणली पाहिजे.

—श्रीअरविंद

(Elements of Yoga)

# वाचकांचे प्रश्न

## विद्याभ्यास व ईश्वरभक्ति

**देव-जीवनाची आकांक्षा बाळगणाऱ्या विद्यार्थ्यासाठीं साधना कोणती ?**

**विद्याभ्यास व परमेश्वर भक्ति दोन्हीं एकाच वेळीं होऊं शकतील काय ?**

आपलें उद्दिष्ट साध्य करून घेण्यासाठीं परिश्रमपूर्वक अभ्यास करणें, प्रयत्न करणें यालाच म्हणावयाचें साधना. देवजीवन जगण्याची ज्याला इच्छा आहे त्याच्या बाबतींत ईश्वराचा साक्षात्कार करून घेऊन त्याद्वारां संपूर्ण आत्म-विकास साधावयाचा हें साधनेचें उद्दिष्ट असतें. हें उद्दिष्ट पुढें ठेवूनच साधकाला आपल्या सर्वांगांचा विकास करावयाचा असतो. आत्म-संयम राखून, आत्म-शुद्धि करून आपलें संपूर्ण जीवन उच्च पातळीवर चढवून देव-जीवनाकडे नेणाऱ्या मार्गाचें अनुसरण करण्यास साधक पात्र होतो. अशारीतीनें स्वतःस पात्र बनविण्यास विद्यार्थी-दशेचा काळ तर आदर्श काळ म्हणतां येईल. कारण याच काळामध्यें चांगल्या संवयी जडतात, स्वभावाला वळण लागतें आणि भावी जीवनाचा पाया घातला जातो. अशा लहान वयांतच जर एकाद्याला सुदैवानें उच्चतर जीवन जगण्याची आंतरिक हांक आली तर खरोखरीच त्याचें तें महद्भाग्य म्हटलें पाहिजे. अन्य कोणत्याहि तऱ्हेच्या जबाबदाऱ्या या वयांत त्याच्यावर नसल्यामुळें सर्वांगांचा विकास साधण्याकडे त्याला आपल्या सर्व शक्ती लावण्याची सुवर्णसंधि लाभते.

शालेय अभ्यासानें साधनेंत मुळींच व्यत्यय येत नाहीं. उलट आत्मविकासाचें तें एक साधन होऊं शकतें. खऱ्या सर्वांगीण आध्यात्मिक जीवनाकरितां शरीराला बलवान, चपळ आणि नमनीय असा आधार बनवावयाचें असतें; ईश्वराचें हें मंदिर शुचिर्भूत व प्रसन्न राखावयाचें असतें. त्यादृष्टीनें, शरीर-संवर्धनासाठीं जीं जीं साधनें व संधी उपलब्ध असतील त्यांचा जास्तींत जास्त उपयोग करून घेणें हें प्रत्येक विद्यार्थ्याचें कर्तव्यच आहे. मन हें ज्ञानाचें साधन व्हावें, त्यांत ज्ञानसंपन्नता यावी म्हणून त्याला वळण लावलें पाहिजे. शालेय बौद्धिक वातावरणांत अध्ययनानें मन हळुंहळुं संपन्न होत जातें. मनाची एकाग्रताशक्ति, ज्ञानाचा प्रत्यक्ष व्यवहारांत उपयोग करण्याची शक्ति आणि विवेचक शक्ति यांचें संवर्धन करण्यास बुद्धिप्रधान अध्ययनाचें साह्य होतें. उदात्त ध्येय साध्य करून घेण्याच्या दृष्टीनें मनाला प्रभावी साधन करणाऱ्या इतरहि कितीतरी शक्तींची त्यामुळें वाढ होते. या भावनेनें केलेलें अध्ययन म्हणजे भक्तीच असते. आपल्या आंतरिक भावभावनांचा कल सत्यं, शिवं, सुंदरं-यांजकडे वळवून ईश्वराप्रत घेऊन जाणाऱ्या या सर्व गोष्टी प्राप्त करण्यासाठीं साधकास स्वतःचा सर्वांगीण विकास करावा लागतो; आणि या विकासासाठीं विद्यार्थी जीवनांत तर अनेक अमूल्य संधी मिळूं शकतात.

ईशमार्गाची एकदां निवड केली म्हणजे जीवनांतील प्रत्येक लहान **गोष्टीसहि** एक नवीन

अर्थ प्राप्त होतो; प्रत्येकच गोष्ट जीवनांत महत्वाची भर टाकत असते. सर्वांगांची वाढ करून पूर्णत्व मिळविण्याच्या दृष्टीनें अभ्यास, खेळ आणि विद्यार्थी-जीवनांतील इतर सर्व कार्यक्रम यांचा उपयोग करून घेतां येईल; नव्हे, वास्तविक हाच त्यांचा उपयोग असतो.

या दृष्टिकोनांतून विद्यार्थ्यानें प्रत्येक गोष्टीकडे पाहिलें पाहिजे. आत्मविकास व आत्म-पूर्णत्वप्राप्ति करून घेण्यास साह्यकारी अशा असंख्य संधींचें स्वागत करतांना त्यानें ईश्वरार्पण भावना व कृतज्ञताबुद्धि राखली पाहिजे.

## कर्म व कर्ता

**कर्म व कर्ता यांची एकरूपता शक्य आहे काय ? आणि त्या अवस्थेंत कर्म शक्य आहे का ?**

होय, निश्चित शक्य आहे. हातीं असलेल्या कर्मामध्यें जेव्हां कर्त्याचें सर्व भान एकत्र झालेलें असतें, केंद्रित झालेलें असतें, जेव्हां त्याच्या सर्व शक्ती त्यावर एकवटलेल्या असतात त्यावेळीं कर्म आणि कर्ता यांमध्यें वास्तविक भेदच राहिलेला नसतो. तें कर्मच तो होऊन गेलेला असतो. कांहीं कामांचें स्वरूपच असें असतें कीं, त्यामध्यें मनाच्या सर्व शक्तींची प्रगाढ एकाग्रता व्हावी लागते. उदाहरणार्थ, शास्त्रज्ञ अथवा गणितज्ञ यांचें संशोधनकार्य. अशा कार्यामध्यें भोंवतालच्या परिस्थितीचा त्यांना पूर्ण विसर पडलेला असतो. ते आपल्या कामांत इतके तन्मय झालेले असतात कीं काम आणि कर्त्याची जाणीव हीं एकरूपच होऊन गेलेलीं असतात.

अशा अवस्थेंत कर्म शक्य आहे, एवढेंच नव्हे, तर कदाचित् आपण असेंहि म्हणूं शकूं, कीं अशा अवस्थेंतच सर्वोत्कृष्ट कर्म संभवतें; कारण त्यावेळीं बाह्यमन हें त्याच्या नित्याच्या यांत्रिक विचारजालापासून पूर्ण अलिप्त असतें, कर्मास अत्यावश्यक असलेल्या भूमिकेशीं कर्त्याची मनोवृत्ति समरस झालेली असते; एवढेंच नव्हे तर मन अशा एका अवस्थेंत स्थिरावलेलें असतें, कीं त्यास त्याच्या उच्चतर व व्यापक अशा जाणीवेच्या (subliminal) क्षेत्रांतून अत्यावश्यक असलेल्या शक्ती व क्षमता प्राप्त होतात. कारण कर्त्याची मानसिक बाह्यचेतना ही आंतील अधिक व्यापक (subliminal) चेतनेचाच एक अंश असते.

अर्थात् या ठिकाणीं 'योगिक कर्म' हा आपला चर्चेचा विषय नाहीं, हें उघडच आहे. तो एक अगदीं स्वतंत्रच विषय होईल.

## देव व त्याचें दर्शन

**ईश्वर जर दगडांत, पशूंत, माणसाच्या हृदयांत आहे, तर तो भक्तांस कां दिसत नाहीं ?**

मनुष्याच्या खऱ्या दृष्टीवर अज्ञानाचें आवरण आलेलें असतें म्हणून. सामान्यतः आपण बाह्य भौतिक चक्षूंनीं पहात असतो. या बाह्य चर्मचक्षूंनीं आपणांला फक्त

जड भौतिक वस्तू दिसतात. परंतु या बाह्य भौतिक इंद्रियांच्या कक्षेपलीकडेहि कांहीं सत्य अवस्था, सत्य अस्तित्व आहे. मानवी चक्षू तेथपर्यंत पोंहचूं शकत नाहींत. त्यांची प्रचीति सूक्ष्म दृष्टीलाच येऊं शकते. अज्ञानाच्या आवरणाखालीं झांकल्या गेलेल्या, प्रत्येक मनुष्यामध्यें विद्यमान् असलेल्या अंतःचक्षूंना, 'चक्षुशः चक्षुः' लाच केवळ त्यांचें दर्शन होऊं शकतें. जेव्हां हें अज्ञान-पटल दूर होतें आणि आंतरींचा डोळा उघडतो त्यावेळीं बाह्य दृष्यांमागील परम सत्याचें दर्शन घेण्यास, विविध नामरूपांमागें विलसणारें 'एक तत्त्व' जाणण्यास मनुष्य समर्थ होतो.

आंतरिक साधनेनें, योगाभ्यासानें हें साधतां येतें. स्वतःचें भान व्यापक करणें, स्वतः-विषयींच्या व दुसऱ्यांविषयींच्या जाणीवेचें क्षेत्र विस्तृत करणें, आपल्या अस्तित्वांतील सुप्त शक्तींवर आलेल्या दाट आवरणांचा अखंडपणें भेद करून, त्या शक्ती जागृत व कार्यान्वित करणें या गोष्टींनीं योगसाधनेची सुरुवात होते; किंवा ईश्वरी कृपेनेंहि केवळ ही आंतर्दृष्टि उघडूं शकते. साधन कोणतें कां असेना, ईश्वराच्या ज्ञानदृष्टीनें पहाण्याचा अधिकार मनुष्याला प्राप्त झाला पाहिजे.

भौतिक जगांतलाच दाखला घेऊं. भौतिक जगतांतहि अशा कांहीं वस्तू असतात, ज्या सामान्य मानवी डोळ्यांनीं दिसूं शकत नाहींत. सामान्य भौतिक दृष्टीची मर्यादा वाढविण्या-साठीं मनुष्यास योग्य साधनसामग्रीनें सुसज्ज व्हावें लागतें; तेव्हांच फक्त त्या गोष्टींचें अस्तित्व तो प्रत्यक्ष अनुभवूं शकतो. विश्वांतील अतिभौतिक सत्यांची प्रचीति घेण्याकरितां सुद्धां अशाच विशिष्ट प्रकारच्या दृष्टीचा, दर्शनशक्तीचा उपयोग केला पाहिजे. त्याकरितां ज्याठिकाणीं सर्वांतर्यामीं भगवंताचें साक्षात् दर्शन आपल्या आत्मचक्षूंना नित्य निरंतर होत असतें, अशी जाणीवेची विशिष्ट अवस्था साध्य करून घेतली पाहिजे.

**'रेवान्'**

---

ज्या भावनाविष्ट माणसाचें स्वतःवर स्वामित्व नाहीं त्याचें जीवन म्हणजे अस्ताव्यस्त पसारा होय.

*

जेव्हां दोन व्यक्ती भांडतात तेव्हां दोघांचीहि चूक असते.

*

संयमित आचरणानें कोणाचेंच कधींच अकल्याण केलेलें नाहीं.

*

—श्रीमाताजी

# दिव्य जीवन

(क्रमशः)

हें उत्तर केवळ वैयक्तिक असूं शकेल; अर्थात् या उत्तरानें केवळ एकादी दुसरी व्यक्ति आध्यात्मिक बनेल; किंवा अनेक आध्यात्मिक व्यक्ती या उत्तरामुळें निर्माण होऊं शकतील, अथवा अशीहि कल्पना करतां येते कीं या उत्तरानें अति मानसिक एक वा अधिक व्यक्ती उदयास येऊन अध्यात्महीन जमावामध्यें कमीअधिक वेगळ्या पडतील. मात्र अतिमानसिक व्यक्ती या उत्तरानें तांतडीनें तयार होणें फारसें संभवनीय नाहीं; असो. या वेगळ्या पड-लेल्या आत्मसाक्षात्कारी व्यक्ती एक तर समाजांतून दूर जाऊन आपल्या दिव्य गूढ स्वाराज्यांत रमतील, आध्यात्मिक एकान्तांत आपल्या आध्यात्मिक धनाचा सांभाळ करीत राहतील; किंवा आपल्या आंतरिक प्रकाशाच्या प्रेरणेनुसार त्याच्या मार्गदर्शनानें आणि सामर्थ्यानें त्या परिस्थि-तींत मानवतेचें भावी जीवन अधिक सुखी होण्यासाठीं काय जें थोडेंबहुत पूर्वतयारीचें कार्य करतां येईल तें करीत राहतील. सांघिक स्वरूपांत आंतरिक परिवर्तन तेव्हांच साकार होऊं शकेल, जेव्हां अध्यात्महीन जमावांत राहणारी अतिमानसिक व्यक्ति स्वतःसारख्या आंतरिक जीवनाच्या कांहीं दुसऱ्या व्यक्ती मिळवून एक संघ तयार करील, आणि हा संघ आपलें सांघिक जीवन पूर्ण स्वायत्ततेनें चालवील, किंवा अतिमानसिक व्यक्तींचा एक स्वतंत्र समाज अथवा पंथ स्थापला गेला आणि त्यांचा जीवनमार्ग त्यांच्या स्वतंत्र आंतरिक विधिविधानांनीं निश्चित झाला तर तीहि व्यवस्था सांघिक स्वरूपांत आंतरिक परिवर्तन साकार होण्यास उप-कारक होईल. पूर्वकाळीं संन्यस्त जीवन घालविणारे साधुसंघ निघत, सामान्य मानवी जीव-नाहून वेगळ्या आध्यात्मिक तत्त्वावर चालणारें स्वयंशासित स्वतंत्र नवें सामुदायिक जीवन संघटित करण्याचे निरनिराळे प्रयत्न होत. त्यांच्या मुळाशीं हीच भावना असे कीं आध्यात्मिक जीवन त्याला योग्य असलेल्या स्वाभाविक वातावरणांत जगतां यावें, यासाठीं त्या जीवनाची आंतरिक क्रियाशक्ति किंवा चालक शक्ति पसंत करील अशा स्वतंत्र नियमावलीनें बांधलेल्या, सामान्य जनतेपासून विभक्त असलेल्या, सामाजिक जीवनाची आवश्यकता आहे. संन्यस्त जीवनसंघ किंवा साधुसंघ हा स्वभावतः परलोकसाधन करणाऱ्या साधकांचा संघ होय. या साधकांचा सगळा खटाटोप आध्यात्मिक सत्याचा शोध करण्यासाठीं व त्याचा स्वतःचे ठिकाणीं साक्षात्कार करून घेण्यासाठींच असतो; हे साधक आपलें स्वतंत्र सामाजिक जीवन संघटित करतात; आणि या संघटनांत जीवनाचे विधी व नियम असे ठेवतात कीं त्यांचा त्यांच्या मुख्य खटाटोपाला उपयोग व्हावा, साह्य व्हावें. सामान्यतः या खटाटोपांत, सामान्य मानवी समाजा-हून सरस नवें जीवन-संघटन करून नवी जागतिक समाजसंघटना निर्माण करण्याच्या प्रयत्नाचा अंतर्भाव होत नाहीं. धर्माचा अंतिम उद्देश तसा असूं शकेल. या उद्देशाला धरून एखादें दुसरें पाऊल टाकण्याचा प्रयत्न धर्म करूं शकेल; मानसिक ध्येयवाद देखील असला प्रयत्न करील. परंतु आजवर असे जे जे प्रयत्न झाले त्यांना नेहमींच हार खावी लागली आहे.

आमच्या प्राणिक (वासनिक) प्रकृतींतील जडतेनें आणि ज्ञान हीनतेनें आपल्या चिकाटीनें त्या प्रयत्नांवर मात केलेली आहे. केवळ मानसिक ध्येयवाद, अपूर्ण एकांगी आध्यात्मिक आकांक्षा, प्राणिक प्रकृतीच्या या अडचणीवर तोड काढूं शकत नाहीं, तिच्यावर कायम सत्ता गाजवूं शकत नाहीं, किंवा तिच्या एकजात आडमुठ्या विरोधांत कांहीं बदल करूं शकत नाहीं; नवें उच्चतर जीवनसंघटन करण्याचा प्रयत्न त्याच्यांतील उणीवेमुळें फसतो किंवा बाहेरच्या जगांतील उणीवा आणि दोष या नव्या संघटनावर आघात व आक्रमण करतात आणि त्यामुळें या संघटनाची जी तद्विषयक आकांक्षेंत उच्च तेजोमय भूमि असते त्या भूमीवरून तें खालीं घसरतें आणि सामान्य मानवी पातळीवरील एका मिश्र आणि हीन दर्जाच्या जमातीचें स्वरूप त्याला येतें. आध्यात्मिक अस्मिता, मानसिक, प्राणिक व भौतिक अस्मितेहून वेगळी आणि उच्चतर पातळीवरची आहे. ती अस्मिता व्यक्त करणारें म्हणून जें सामान्य सामुदायिक आध्यात्मिक जीवन योजलेलें असतें, जो आध्यात्मिक समाज योजिलेला असतो त्याचा पाया आणि संरक्षक आधार, सामान्य मानवी समाजाच्या मानसिक, प्राणिक, भौतिक मूल्यांहून उच्चतर, श्रेष्ठतर मूल्यांचा असणें आवश्यक आहे. असा पाया त्याला नसेल तर तो सामान्य मानवी समाजाचाच एक प्रकार, थोडा निराळेपणा असलेला प्रकार होईल. यापेक्षां अधिक महत्त्व त्याला असणार नाहीं. खरें नवें जीवन अस्तित्वांत यावयाचें तर पुष्कळशा माणसांत अगदीं नवी जाणीव, नवी प्रज्ञा विकसित होणें आवश्यक आहे; या नव्या प्रज्ञेनें त्यांचें सर्व अस्तित्व त्यांचें मानसिक, प्राणिक, भौतिक प्रकृतितत्त्व बदलून टाकावयास हवें. सर्वसाधारण मनः-प्राण-शरीरप्रकृति या प्रमाणें रूपांतरित, परिवर्तित केली गेली तरच नवें, ज्याला कांहीं मोल, महत्त्व, किंमत आहे असें, सामुदायिक जीवन अस्तित्वांत आणतां येईल. एरवी ही गोष्ट शक्य नाहीं. मानसिक प्राणी निर्माण करण्यापर्यंत विकासक्रम आला आहे. आतां यानंतर या विकासक्रमाचा यत्न, मानसिक प्राण्याचा एखादा नवा प्रकार निर्माण करण्याकरितां न होतां त्या यत्नाची दिशा, असे नव्या जातीचे प्राणी निर्माण करण्याची असली पाहिजे कीं ज्या प्राण्यांनीं आपल्या पार्थिव प्रकृतीची सध्यांची मनोयुक्त पशुत्वाची पातळी सोडून त्या प्रकृतीच्या उच्चतर आध्यात्मिक पातळीवर आपल्या सर्व अस्तित्वाला व जीवनाला चढवून स्थिर केलें आहे.

अशा प्रकारचें पूर्ण परिवर्तन पार्थिव जीवनांत होणें आणि तें पुष्कळांच्या पार्थिव जीवनांत होऊन स्थिर होणें, ही गोष्ट एकदम घडून येणें शक्य नाहीं. या परिवर्तनाच्या दिशेनें वळण घ्यावयाचें स्थान आलें, या स्थानावर निश्चयदर्शक सीमोल्लंघन होऊन परिवर्तनाचें कार्य सुरु झालें, तरी हें नवें जीवन आरंभीं आरंभीं एका मोठ्या दिव्यांतून जाण्यासारखें असेल. या दिव्याच्या कालखंडांत या नव्या जीवनाचें संगोपन व संवर्धन फार जिकीरीचें असेल. परिवर्तनाच्या कार्यांत पहिली आवश्यक पायरी म्हणजे, आध्यात्महीन जाणीवेच्या पायावर, तिच्या आधारानें चालत असलेलें आमचें सर्व जुनें जीवन अध्यात्मसंपन्न जाणीवेच्या पायावर उभें करणें व त्या आधारानें चालविणें, सुरु करणें, ही आहे. या पायरीवर पाऊल टाकण्यापूर्वींहि बरीच तयारी बराच काळपर्यंत करावी लागण्याचा संभव आहे; तसेंच परिवर्तनकार्य सुरु झालें तरी तें टप्प्या-टप्प्यानेंच प्रगति करूं शकेल. वैयक्तिक परिवर्तन घेतलें तर असा संभव आहे कीं, एक विशिष्ट टप्पा ओलांडल्यानंतर व्यक्तीच्या परिवर्तनाचा वेग खूप वाढेल व हें परिवर्तन कदाचित् विकासाच्या सर्वसामान्य मंद गतीला बाजूला ठेवून, विकासाची जणुं एक उडी

घेऊन पूर्णता प्राप्त करून घेईल. परंतु हें वैयक्तिक परिवर्तन म्हणजे जीवांची नवी जात निर्माण होणें नव्हे, किंवा नवें सामुदायिक जीवन अस्तित्वांत येणें नव्हे. अशी कल्पना आपण करूं शकतो कीं, जुनें अध्यात्महीन जीवन सभोंवार चालू असतांना कांहीं व्यक्ति विकसित होऊन, अध्यात्म जीवन जगूं लागून सामान्य जीवनापासून वेगळ्या पडल्या आहेत आणि या वेगळ्या झालेल्या व्यक्ती एकत्र येऊन त्यांनीं संघ स्थापून नव्या जीवनाचें एक केंद्र तयार केलें आहे. परंतु प्रकृति या प्रमाणें विकासकार्य करील असा फारसा संभव नाहीं; तसेंच सभोंवार कनिष्ठ प्राकृतिक जीवन चालूं असतांना त्या कोंडींत कोणत्याहि व्यक्तीला स्वतःमध्यें आध्यात्मिक परिवर्तन पूर्ण करतां येणें हीहि गोष्ट फार अवघड आहे. एक विशिष्ट परिवर्तित अवस्था आल्यानंतर, फार काळापासून चालत आलेल्या जुन्या प्रथेचा, स्वतंत्र समाज स्थापण्याच्या प्रथेचा परिवर्तित व्यक्तींनीं आश्रय घेणें आवश्यक होईल असा संभव आहे. असा स्वतंत्र समाज स्थापण्याचे उद्देश दोन असतील. व्यक्तीला सामान्य जनापासून वेगळें स्थान आणि वेगळें जीवन वेगळेंपणें जगण्याची सोय असावी, एक सुरक्षित वातावरण असावें, अशाकरितां कीं या अनुकूल वातावरणांत व्यक्तीच्या जाणीवेला आपला विकास साधण्याकडे सर्व लक्ष केंद्रित करतां यावें. या ठिकाणीं व्यक्तीच्या सभोंवारच्या सर्व गोष्टींना तिच्या जाणीवेचा विकास साधण्याच्या तिच्या जिव्हाळ्याच्या एकाग्र प्रयत्नाला साह्य व्हावें या एकाच मध्यवर्ति हेतूनें आकार आणि आश्रय देण्यांत येईल. स्वतंत्र समाज स्थापण्याचा दुसरा उद्देश असा कीं, एकाग्र प्रयत्नानें वैयक्तिक विकास योग्य प्रमाणांत होऊन नवें जीवन आकारास आणण्याची पूर्वतयारी पूर्ण झाली म्हणजे त्या अनुकूल पूर्वनियोजित श्रमसिद्ध आध्यात्मिक वातावरणांत आणि परिस्थितींत नवें जीवन साकार करून, मूर्त करून त्याचें संवर्धन करावें. अशी शक्यता आहे कीं, असा एकाग्र प्रयत्न जाणीवेच्या परिवर्तनाच्या दिशेनें चाललां असतां, परिवर्तनाच्या अडचणीहि आपल्या शक्ती एकाग्रतेनें जमवून केंद्रित करून सामन्यासाठीं उभ्या रहातील. कारण, ज्या जगांत बदल करावयाचा आहे त्याच्या परिवर्तनानुकूल अशा शक्यता वरील स्वतंत्र समाजांतील प्रत्येक साधकांत जशा असतील त्याचबरोबर त्या जगाचे दोष व उणीवाहि असतील. अर्थात् प्रत्येक साधक आपल्याबरोबर आपले परिवर्तनानुकूल सामर्थ्य व गुणसंभार जसा आणील, तसा तो आपल्या पूर्वीच्या प्रकृतींत असलेले परिवर्तनविरोधी दोष आणि कठीण गोष्टीहि आणील; आणि त्याचा नवा स्वतंत्र समाज लहान असल्यानें त्या संकुचित क्षेत्रांत आणि तेथील व्यक्तींच्या अगदीं समीप समीप असलेल्या लहान सामुदायिक जीवनांत, विकासानुकूल संवर्धित केंद्रित शक्ति आणि विकासविरोधी संवर्धित केंद्रित शक्ति यांचा सामना होऊन दोन्हीं पक्ष समबल ठरण्याचा संभव आहे. पूर्वी मानसिक पातळीवरील मनुष्यांनीं सामान्य मानसिक-प्राणिक जीवनाहून कसलें तरी अधिक सत्यमय आणि सुसंवादी जीवन विकसित करण्याचे जे जे प्रयत्न केले ते सर्व प्रयत्न या समबलतेच्या अडचणीमुळें अयशस्वी झाले. तेव्हां, प्रकृति जर तयार झाली असेल, तिनें जर विकासविषयक निर्णय अध्यात्मानुकूल असा घेतला असेल, किंवा जाणीवेच्या उच्च स्तरांतून खालीं उतरणाऱ्या चैतन्यांत, आत्म-तत्त्वांत इष्टसिद्धीपुरतें संकल्पसामर्थ्य असेल तर वरील अडचण दूर होईल आणि आध्यात्मिक जीवन ज्यांचें वैशिष्ठ्य आहे असे पहिले पहिले एक वा अधिक मानव आणि मानवसमाज विकासमार्गानें तयार होतील. —श्रीअरविंद

# युवकांनो—

प्रत्येक व्यक्तीला, विशेषतः भारताचें, जगाचें, ईश्वराचें कार्य करण्यास पुढें सरसावणाऱ्या तरुण पिढीला आमचें असें सांगणें आहे कीं, "जर तुमचीं मनें युरोपियन कल्पनांनीं भारलेलीं असतील, तुम्ही आपल्या जीवनाकडे भौतिक जडवादी दृष्टीनें पहात असाल तर हीं ध्येयें तुम्ही स्वतःपुढें ठेवूं शकणार नाहीं; मग तीं साध्य करून घेणें दूरच. भौतिक दृष्टीनें पाहिलें असतां तुम्ही कोणीच नाहीं, आध्यात्मिक दृष्टीनें पहातां तुम्ही सर्व कांहीं आहांत. भारतीय मनुष्यच केवळ कोणत्याहि गोष्टीवर विश्वास ठेवूं शकतो, कोणतेंहि कार्य करावयास धजतो, सर्वस्वाचा त्याग करूं शकतो. पण त्याकरतां प्रथम भारतीय व्हा. आपल्या पूर्वजांचा वारसा परत मिळवा. आर्य विचार, आर्य शिस्त, आर्य शील आणि आर्य जीवन पुनः संपादन करा. वेदान्त, गीता, योग हीं पुनश्च प्राप्त करून घ्या. केवळ बुद्धीनें अथवा भावनेनें नव्हे तर तुमच्या प्रत्यक्ष जीवनांत तीं संपादन करा. त्यांचें आचरण करा म्हणजे तुम्ही थोर आणि समर्थ, बलाढ्य, अजिंक्य आणि निर्भय व्हाल. जगण्याची किंवा मरणाची भीति तुम्हांस वाटणार नाहीं; 'अडचण' आणि 'अशक्यता' हे शब्द तुमच्या शब्दकोशांत रहाणार नाहींत. कारण स्वतःच्या आत्म्याचें ठिकाणीं जें सामर्थ्य असतें तें शाश्वत, सनातन असतें. बाह्य 'स्वराज्य' मिळविण्यापूर्वी हें तुमचें आत्म्याचें साम्राज्य, आंतरिक स्वराज्य तुम्हीं प्रथम परत मिळविलें पाहिजे. तुमचें अंतरंग हें मातृदेवतेचें निवासस्थान आहे, तिचें तेथें तुम्ही पूजन करावें आणि तुम्हांला सामर्थ्य द्यावें म्हणून ती तुमची वाट पहात आहे. तिच्यावर निष्ठा ठेवा, तिची सेवा करा, तुमच्या सर्व इच्छा तिच्या इच्छेशीं एकजीव करा, तुमचा अहंकार राष्ट्राच्या महान् 'अहं' मध्यें विलीन करून टाका, तुमचा विभक्त स्वार्थ मानवजातीच्या सेवेमध्यें अंतर्भूत होऊं द्या. तुमच्या अंतःकरणामधील सर्व सामर्थ्याचें उगमस्थान प्राप्त करून घ्या; म्हणजे मग सर्व कांहीं गोष्टी—सामाजिक सुदृढता, बौद्धिक श्रेष्ठत्व, राजकीय स्वातंत्र्य, मानवी विचारांचें स्वामित्व, जगाचें नेतृत्व—सर्व कांहीं तुम्हांला दिलें जाईल.

—श्रीअरविंद

'कर्मयोगिन्'—१९ जून १९०९

CWSA - Karmayogin : Page 27

---

पूर्णत्व म्हणजे कमाल मर्यादा अथवा अतिरेक नव्हे, पूर्णत्व म्हणजे समतोल व सामंजस्य-पूर्ण वाढ.

*

भावनावेगांच्या आहारीं जाऊन कोणतेंच कर्म करूं नका.

*

—श्रीमाताजी

# आश्रम-वृत्त

## एप्रिल ते ऑगस्ट

एप्रिल ते ऑगस्ट १९५७ या तिमाहीच्या सुरुवातीस खेळांचे वार्षिक सामने संपले. दर वर्षीप्रमाणें ९ मे रोजीं बक्षीस-वितरण सभारंभ उत्साहानें पार पडला.

२४ एप्रिल हा दर्शन दिवस ! मंगलप्रभातीं विविध रंगांचे गणवेष घातलेल्या निरनिराळ्या दलांनीं पंक्तिबद्ध होऊन बाल्कनीवर श्रीमाताजींना अभिवादन केलें आणि नंतर सर्वांनी समाधीच्या भोंवतीं उभें राहून मौन-ध्यान केलें.

या तिमाहींत गुजराथचे एक प्रथितयश कलाकार नृत्यकुशल श्री. हिंमतसिंह चौहाण यांनीं विश्वविद्यालयाच्या नाटयगृहांत एक सुंदर, मनोरंजक व आकर्षक असा नृत्य-अभिनयाचा कार्यक्रम करून दाखविला. शास्त्रीय पद्धतीच्या भावमुद्रा त्यांनीं फारच उत्तम रीतीनें वठविल्या.

पोहण्याच्या तलावावर आजकाल खूप गर्दी होत असते. विशेषतः या उष्म्याच्या दिवसांत आश्रमवासी त्याचा पुरेपूर फायदा घेत आहेत.

नुकताच एक नवीन उपक्रम आश्रमांत सुरु झाला आहे. जीं कामें साधारणतः मजुरांकरवीं केलीं जात असत, तींच आतां आश्रमवासियांनींच स्वतः करण्यास प्रारंभ केला आहे. आश्रमामध्येंच दुसऱ्या मजल्यावर एक खोली बांधण्याचें काम, सध्यां आश्रमीय बाल व प्रौढ विद्यार्थ्यांच्या गटाकडून मोठ्या उत्साहानें चालू आहे.

## ऑगस्ट ते नोव्हेंबर

१ जुलै ते १ सप्टेंबर दोन महिने दररोज मैदानी खेळांचे सामने सुरू होते.

शारीरिक शिक्षण-प्रमुख श्री. प्रणवकुमार यांच्या वाढदिवसानिमित्त १८ आक्टोबर रोजीं विद्यार्थ्यांनीं सुमारें दोन तास विविध प्रकारच्या खेळांचे प्रेक्षणीय प्रयोग करून दाखविले.

२० आक्टोबर रोजीं श्री. चिंतामणराव देशमुख व सौ. दुर्गाबाई देशमुख यांनीं आश्रमास भेट दिली. आश्रमाचे कांहीं विभाग व श्रीअरविंद आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचें काम त्यांनीं पाहिलें.

या तिमाहींत विशेष प्रसंगीं श्रीमाताजींनीं जे संदेश दिले, त्यांचा भावानुवाद खालीं देत आहोंत.

**दुर्गाष्टमी** (३० सप्टेंबर)

श्रीअरविंदांच्या शिकवणीचें जिवंत उदाहरण बनणें, यापेक्षां दुसऱ्या अधिक चांगल्या रीतीनें आपण त्यांच्या विषयींची आपली कृतज्ञता व्यक्त करूं शकणार नाहीं.——श्रीमाताजी.

*

**विजयादशमी** (२ आक्टोबर)

जे केवळ भौतिक चक्षूंचाच उपयोग करतात त्यांना, विजय संपूर्ण झाल्यानंतर म्हणजेच तो भौतिक रूपांत सिद्ध झाल्यानंतरच केवळ, दिसूं शकेल. —श्रीमाताजी

CWMCE Vol 15 : Page 207

*

**महालक्ष्मी पूजा** (८ आक्टोबर)

आगमन होत असलेल्या दिव्य दिनाचें गान त्यानें गायिलें,
मानवरूपांतील देवत्वाचें, हिरण्मय दिव्य बालकाचें
आणि मानवाच्या जिवलग स्वर्गीय परम प्रकृतीचें गान त्यानें गायिलें.
अवतरणाऱ्या परम-प्रकाश-चरणांचें गान
आणि अंतरंगांतील ज्वालेची किमया त्यानें गायिली;
घोर निशेचा पराभव व अद्‌भुत परिवर्तन यांचें
आणि आत्म्याच्या आलिंगनाच्या संघर्ष-विमुक्त हास्याचें गान त्यानें गायिलें,
ज्वालांच्या प्रलयामध्यें दिव्यरूप झालेलें दुःख
आणि जादूच्या स्पर्शामध्यें ज्याचें रूपांतर झालें आहे असा हर्ष,
स्वतःच्याच बंधनांतून दिव्यप्रेमामुळें मुक्त झालेलें पाप
आणि शुभ्र दिव्यानंदामध्यें ज्याचा विलय होऊन जाईल असा शोक यांचें,
आणि पृथ्वीला विस्मित करणाऱ्या अमृतत्त्वाचें गान त्यानें गायिलें. —श्रीअरविन्द

*

**काली पूजा** (२२ आक्टोबर)

"मानवाच्या वेदना, त्याचें नित्याचें परिश्रम वृथा आहेत,
त्याच्या यात्रिदलाचें, कालाच्या मरुभूमींतून अनंताप्रत जाणें व्यर्थ आहे,
त्याच्या साऱ्या उज्ज्वल आशा-आकांक्षांच्या समोर
घनघोर आणि प्रदीर्घ निशा आडवी येते,
आणि पिकाची कापणी केल्याप्रमाणें, मानवी दलांची,
मानवसमाजाची कत्तल काळ्याकभिन्न कोयत्यानें मृत्यू
करीत असतो"—असें लोक म्हणतात.
पण, आतांपर्यंत सारें जीवन असफल झालें म्हणून
निरंतरचेंच तें असफल झालें पाहिजे, असें आहे काय?
अधिक महान् प्रयास करण्यासाठीं युगानुयुगें आपणासमोर नाहींत काय?
या दास्यपूर्ण भीतिप्रद जगतामध्येंहि आपणांसभोंवतीं दिव्य सौंदर्य विद्यमान् नाहीं काय?
आपल्या पावलांना प्रेरणा देणारें परम धैर्य आणि
अनंततेला आवाहन करणारा महान् विचार आपणांजवळ नाहीं काय? —श्रीअरविंद

*

# साहित्य-सत्कार

१. **श्रीअरविंद वाक्सुधा**––(प्रकाशक––श्रीअरविंद बुक्स डिस्ट्रिब्यूशन एजन्सी. लि० सह-कार ३१ बी रोड, चर्च गेट, मुंबई-१. पृष्ठें-६४ किं. ६ आणे.)

श्रीअरविंदांच्या सागरतुल्य अपार वाङमयांतून तेजस्वीं विचार मौक्तिकें शोधून काढून ती या पुस्तिकेंत गुंफलीं आहेत. अखिल विश्वाला पोटांत घेऊं शकेल अशा अतीत भूमिके-वरून लेखन करतांना श्रीअरविंदांच्या विचारांना जी व्यापकता येते व जी अगाधता प्रतीत होते त्याची कल्पना या कांहीं वेंच्यांनीं येणें कठीण आहे, तरीपण या विचारशलाकांच्या द्वारें त्या ज्ञानसूर्याचें ओझरतें तरी दर्शन झाल्याशिवाय रहात नाहीं. यांतील कांहीं विचार नव-तेजानें दिपविणारे, समस्यांची उकल करणारे तर कांहीं साधनेस मार्गदर्शक व जीवन समृद्धीस पोषक आहेत. प्रत्येक वाक्यांत मंत्रशक्तीचें सामर्थ्य आहे. योगमार्गावरील साधकांस किंवा व्यावहारिक जीवन यशस्वी रीतीनें जगण्याची इच्छा धरणारांस जसा हा संग्रह उपयोगी आहे तसाच उदयोन्मुख तरुणपिढीस व जिज्ञासू विचारवंतांनाहि प्रेरणा देणारा आहे. कारण त्यांत विषयांची विविधता आहे व भिन्नभिन्न पातळीवरून केलेलें विवेचन आहे. ह्या पुस्तिकेचें स्वरूप कळण्यास मदत होण्याच्या दृष्टीनें त्यांतील कांहीं वेंचें दिल्यास तें अस्थानीं होणार नाहीं.

"पार्थिव दृष्टचा तूं कोणीहि नाहींस; परंतु आध्यात्मिक दृष्टचा तूं सर्व कांहीं आहेस."

*

"मनुष्याची किंमत त्याचें शिक्षण, दर्जा, कीर्ति वा कार्य ह्यावर अवलंबून नसून त्याचें व्यक्तित्व व अंतर्गत घडण यावर ठरत असते."

*

"निर्भयता व स्वामित्व ह्या बाबतींत जगाशीं सिंहाप्रमाणें वागा; धीरता व सेवा यांमध्यें ऊंट व्हा. गाईप्रमाणें शांतता, सहनशीलता व मातेची ममता दाखवा, सिंह आपल्या भक्ष्या-वर झडप घालतो तसें देवानें निर्माण केलेल्या सर्व आनंदावर तुटून पडा. परंतु त्या विपुल उन्मादानें भारावून गेलेल्या आनंदवनभुवनांत सर्व मानवजातीसहि घेऊन या."

*

"दुसऱ्यांना तुमच्याबद्दल काय वाटतें हें महत्वाचें नसून तुम्ही स्वतः कसें आहांत ही गोष्ट महत्वाची आहे."

*

"सर्व धन हें भगवंताच्या मालकीचें आहे. धनवान् म्हणजे केवळ विश्वस्त; मालक नव्हे; आज तें त्याच्याकडे आहे तर उद्यां तें दुसऱ्याकडे जाईल. परंतु मुख्य गोष्ट ही आहे

कीं, ज्यावेळीं धन आपल्याकडे असतें त्यावेळीं आपण विश्वस्ताची कामगिरी कशी बजावतो, आपल्यामध्यें कोणती प्रेरणा काम करते, कोणत्या हेतूनें आपण त्याचा विनियोग करतो व कोणत्या कार्यासाठीं करतो."

★

"सर्व चराचर सृष्टीमध्यें ईश्वरी सौंदर्याचें दर्शन घेणें, अखिल वस्तुमात्रांत विलसणाऱ्या त्या दिव्य सौंदर्यावर प्रेम करणें व त्या प्रेमांत आणि सौंदर्यांत निरागस आनंदाचा रसास्वाद घेणें हाच मानवजातीला परमेश्वरासाठीं जाण्याकडे आंखलेला मार्ग आहे."

★

२.—Sri Aurobindo on India

श्रीअरविंद महायोगी म्हणून जगविख्यात आहेत. तसेंच राष्ट्रधर्माचे प्रणेते व प्रवर्तक म्हणूनहि ते भारतास सुपरिचित आहेत. त्यांच्या जीवनांतील केवळ पांच वर्षांचाच काळ प्रत्यक्ष राजकारणांत गेला असला तरी त्यांनीं वंदेमातरम् व कर्मयोगिन् या नियतकालिकांतून लिहिलेल्या प्रभावी लेखनामुळें व त्यांनीं दिलेल्या व्याख्यानामुळें तत्कालीन राजकीय चळवळीच्या ध्येयांत, धोरणांत व पद्धतींत आमूलाग्र क्रांति घडून आली. अखिल भारतांत एका नवशक्तीचा सचार झाला. विशेषतः त्यावेळच्या लिखाणांतील व व्याख्यानांतील स्फूर्तिप्रद विचारांचा व उद्‌गारांचा संग्रह या पुस्तिकेंत केलेला आहे.

भारताचें प्राचीन वैभव, त्याचें राष्ट्रमालिकेंतील स्थान, मानवजातीकरितां त्याचें आध्यात्मिक नियत कार्य, त्याची जीवनविषयक दृष्टि, त्यानें निर्माण केलेलें आदर्श असें कितीतरी विषय या सग्रहांत आलेले आहेत. त्यांच्या वाचनानें स्फूर्ति येते, जाज्वल्य देशभक्तीनें हृदय भरून येतें, प्रत्यक्ष कार्य करण्यास प्रचंड उत्साह येतो. त्यामुळें कोणाच्याहि मनावर देशप्रेमाचे, नीतिमत्तेचे व आध्यात्मिकतेचे संस्कार घडल्याशिवाय रहात नाहींत.

शेवटीं दिलेलें दुर्गास्तोत्र प्रत्येक तरुणाच्या तोंडीं खेळत राहिलें पाहिजे, त्यांतील ध्येयास धरून त्यानें आपलें जीवन घडविण्याचा रात्रंदिवस प्रयत्न केला पाहिजे इतकें तें महत्वाचें आहे. त्याच्या प्रभावानें नवभारताच्या अगीं तेज, सामर्थ्य, बल, वीर्य, धैर्य इत्यादि महान् गुणांची जोपासना होण्यास निश्चितच मदत होईल.

वरील दोन्हीं पुस्तकें, मुखपृष्ठावरील श्रीअरविंदांच्या रंगीत छायाचित्रानें विशेष आकर्षक झालीं आहेत. पुस्तकाचा सुटसुटीत आकार, किंमत आणि अंतर्बाह्य मनोवेधकता यामुळें आपल्या मित्रमंडळींना प्रेमाची बहुमोल देणगी म्हणून देण्यासाठींहि त्यांचा उपयोग होऊं शकेल.

★

**जीवन विकास** (संचालक––स्वामी भास्करेश्वरानंद, श्री रामकृष्ण आश्रम, नागपूर. संपादक––स्वामी शिवतत्त्वानंद, स्वामी व्योमरूपानंद व श्री वि. शं. बेनोडेकर एम्. ए., आक्टोबर १९५७, वर्ष १लें अंक ८वा.)

मानवी जीवनाला उच्च अधिष्ठान प्राप्त करून देणारे, आध्यात्मिक, धार्मिक व सांस्कृतिक अभिरुचीचा आनंद मिळवून देणारे, शिक्षण, समाजजीवन, मानसशास्त्र, कला, अर्थशास्त्र व विज्ञान इत्यादि अंगोपांगांना भागवत् जीवनाकडे परिचालित करणारे साहित्यिक प्रयोग होणें ही आजच्या युगाची निकड आहे. नागपूर येथील श्रीरामकृष्ण आश्रमाच्या वतीनें प्रकाशित होणारे नवे मराठी मासिक 'जीवन-विकास' ही निकड महाराष्ट्रांत यथाशक्ति पुरवील असें वाटतें. विद्वत्ताप्रचुर संपादकीयाव्यतिरिक्त मान्यताप्राप्त अनेक विद्वानांचे लेख, उदा० 'शिक्षणांत धर्माचें स्थान', 'शंकराचार्य आणि ज्ञानेश्वर' 'महाकवि गालिबच्या काव्यातील तत्त्वज्ञान' 'नामदेवाचें आध्यात्मिक चरित्र' 'भौतिक विज्ञानाचें तात्त्विक स्वरूप', इत्यादि फार मननीय आहेत. पण त्याहिपेक्षां उपनिषदांतील उतारे, 'स्वामी ब्रह्मानंदजींच्या सह-वासांत्' हें संकलन आणि श्रीरामकृष्ण व स्वामी विवेकानंदाचे प्रभावी शब्दोद्गार, चिकित्सक बुद्धीच्या मराठी मनावर विशेष ठसा उमटवितील. मुखपृष्ठावरील पुण्यधाम पंचवटीचे आकर्षक चित्र श्रद्धावंतांना स्फूर्ति देऊं शकेल.

जीवन विकासाला आम्ही सुयश चिंतितो.